# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

July-August 2022 / Issue No. 4 / Price : Rs. 30/-

आज़ादी का अमृत महोत्सव






## GST कर प्रणाली 5 वर्ष पूर्णाहुति




सक्षम नेतृत्व
मान. एकनाथजी शिंदे
मुख्यमंत्री
मान. देवेंद्रजी फडणवीस
उपमुख्यमंत्री
आव्हाने
लढण्यासाठीच असतात...
कर्तृत्व
झळकण्यासाठीच असते...
नेतृत्व
सिध्द करणारे क्षण
आनंदाचेच असतात...
अ · भि · नं · द · न
महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक,
प्रागतिक भूमिकेला
नवी दिशा... नवी आशा!
MACCIA 100
Apex Chamber of the State
1927-2027
महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अॅग्रीकल्चर
महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर
स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्राच्या औद्योगिकरणाचा पाया रचणारी
व्यापार, उद्योग व कृषी उद्योगक्षेत्राची शतकमहोत्सवी शिखर संस्था

GLORIOUS 95 YEARS - MARCHING TOWARDS CENTENARY
MACCIA™ 100
Apex Chamber of the State 1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

July - August 2022 / Issue No. 4

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९६६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **उमेश दाशरथी**
- उपाध्यक्ष
  **करुणाकर शेट्टी**
  **शुभांगी तिरोडकर**
  **रविंद्र माणगावे**
  **सुधाकर देशमुख**
  **चंद्रशेखर पुनाळेकर**
  **तनसुख झांबड**
- प्रभारी सरकार्यवाह
  **सागर नागरे**
- संपादक
  **विनी दत्ता**
- सहसंपादक
  **अविनाश पाठक**
- **शाखा कार्यालय**
- २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक - १. फोनः (०२५३)२५७७७०४ । ई-मेलः nsk@maccia.org.in

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

## अंतरंग

१) मनोगत
२) 'जीएसटी' कर सुधारणांमध्ये 'महाराष्ट्र चेंबरने' दिलेल्या सूचनांचा विचार करू - अर्थमंत्री निर्मला सीतारामन
३) व्यापार उद्योगाला पूरक धोरण राबवणारे सरकार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे
४) अन्नधान्य खाद्यपदार्थ व गुळावरील जीएसटी संबंधी नवीन नियमात आवश्यक त्या दुरुस्त्या करू - केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी
५) अन्न धान्यावरील जीएसटी विरोधी देशभर आंदोलन उभारणार - ललित गांधी
६) महाराष्ट्रातील लघु उद्योगांना शेअर मार्केटमधून भागभांडवल उभारून देणार - ललित गांधी
७) महिलांना कौशल्य विकासाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर व रुमादेवी फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार
८) महाराष्ट्र - इंडोनेशिया मधील व्यापार संबंध अधिक दृढ व्हावेत - इंडोनेशियन राजदुत श्रीमती ईना कृष्णमूर्ति
९) मराठवाडा चेंबर चा रौप्यमहोत्सव ही गौरवपूर्ण अभिमानास्पद बाब - ललित गांधी
१०) महाराष्ट्रातील रेल्वेच्या प्रश्नांसंबंधी संयुक्त बैठक आयोजित करू - केंद्रीय मंत्री दर्शना जरदोश
११) कौशल्य विकास संस्थांची पूर्वीची देयके देण्याबरोबर महाराष्ट्र चेंबरच्या अन्य प्रस्तावाव सहकार्य करू - दिपेंद्र कुशवाह
१२) एमएसएमईंनी सुरक्षेसाठी ऑरगनायझेशन सिक्युरिटी पॉलीसी करावी - डॉ. हेरॉल्ड डिकॉस्टा
१३) प्लास्टीक -पेपर उत्पादने बंदी, जीएसटी यासारख्या विषयावर विदर्भातील व्यापाऱ्यांनी संघटीत व्हावे - ललित गांधी
१४) जीएसटी लढ्यासंबंधीचा प्रगतीचा आढावा....
१५) भारतीय मानक ब्युरो च्या महाराष्ट्र राज्य समितिवर ललित गांधी यांची निवड
१६) राज्याच्या व्यापार, उद्योगासह आर्थिक प्रगतीसाठी विधिमंडळाचा प्रभावी उपयोग - ॲड. राहुल नार्वेकर, विधानसभा अध्यक्ष



# संपादकीय..

ललित गांधी

**अध्यक्ष**

महाराष्ट्र राज्याच्या व्यापार, उद्योग, सेवा क्षेत्र व कृषी क्षेत्राचा चौफेर विकास व्हावा यासाठी महाराष्ट्र चेंबर गेल्या ९५ वर्षांपासून कार्य करत आहे. राज्य, देश व जागतिक स्तरावर महाराष्ट्र चेंबरने राज्यातील व्यापार, उद्योगाला स्थान मिळवून दिले आहे. नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकारीणीचा पदग्रहण कार्यक्रम संपन्न झाला. त्याप्रसंगी राज्याच्या व्यापार उद्योग, सेवा क्षेत्र व कृषी उद्योग क्षेत्राच्या विकासाचे धोरण जाहिर केले व त्यानुसार कामकाजही सुरू झाले आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने राज्यातील व्यापार उद्योगांच्या विकासासाठी कार्य सुरू आहे. केंद्र सरकारने नव्याने अन्नधान्यावर लागु केलेला ५% जीएसटी रद्द व्हावा यासाठी 'महाराष्ट्र चेंबर' ने पुढाकार घेऊन राज्यभरातील आंदोलनाचे नेतृत्व केले. राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार, आमदार यांच्यासह केंद्रीय मंत्री, अर्थमंत्री यांच्या भेटी घेऊन या विषयी सामान्य ग्राहक व छोटे व्यापारी या सर्वांना दिलासा देण्याचा प्रभावी प्रयत्न केला आहे. यात यश मिळेल असा विश्वास आहे.

या विषयावर राज्यभरातील व्यापारी संघटीत व्हावेत, जागृत व्हावेत या उद्देशाने ३१ जुलै २०२२ रोजी छत्रपति संभाजीनगर येथे **'भव्य राज्यस्तरीय व्यापार महापरिषद'** आयोजित केली होती. त्याला व्यापाऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. **राज्याचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री नाम. एकनाथजी शिंदे** यांनी या परिषदेचे उद्घाटन करून मार्गदर्शन केले व या प्रश्नी न्याय देण्याचे आश्वासन दिले.

चेंबरच्या गौरवशाली परंपरेला मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीने वैभव प्राप्त झाले.

उत्तर महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, विदर्भ या विभागात विविध दौरे आयोजित करून विविध जिल्ह्यात बैठका, परिषदा, सभा होऊन, व्यापारी उद्योजकांना मार्गदर्शन केले.

महिला उद्योजकता समितिने मुंबई, नाशिक, कुडाळ, अकोला अशा विविध ठीकाणी महिलांचे भव्य मेळावे घेऊन चेंबरच्या महिला धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत.

पर्यावरण समितिने मुंबई, नाशिक, सोलापूर अशा विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन केले.

ठाणे कॉन्टॅक्ट सेंटर ने नेहमीप्रमाणे आपल्या उपक्रमात सातत्य राखणे आहे. उर्वरीत समित्यांचे कार्य ही येणाऱ्या काळात जोरदारपणे सुरू झालेले दिसेल असा विश्वास आहे.

देशाच्या इतिहासातील महत्वपूर्ण घटना समजली गेली ती २०१७ साली 'जीसटी' ही नवीन करप्रणाली लागु होणे.

या प्रणालीला ५ वर्षे पुर्ण झाल्यानिमित्त विज्ञान भवन नवी दिल्ली येथे भारत सरकार तर्फे आयोजित भव्य सोहळ्यात चेंबरच्या वतीने मी व उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी सहभागी झालो.

महाराष्ट्राच्या वतीने समारंभात सादरीकरण तयार करणे व सादर करण्याच्या टीममध्ये सहभागी झालो. सर्वात उत्तम सादरीकरण झाल्याबद्दल अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी जाहीर कौतुकही केले.

व्यापार, उद्योग, सेवा क्षेत्राच्या विकासाबरोबरच समस्या सोडविण्यासाठीही महाराष्ट्र चेंबर नेहमीच अग्रभागी असते. राज्यातील व्हीटीपी संस्थांचे प्रदीर्घ काळ प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी चेंबरने जोरदार प्रयत्न केले आहेत.

सध्या प्लास्टीक, पेपर कप, प्लेट, द्रोण, पत्रावळी, नॉन वुव्हन बॅग वरील बंदीमुळे राज्यातील या क्षेत्रातील व्यापारी, उत्पादक, महिला उद्योजक, युवा उद्योजक प्रचंड अडचणीत आले आहेत. या क्षेत्रातील २० लाख कामगार बेकार होण्याची भिती निर्माण झाली आहे.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' ने हा विषय गांभीर्याने हाती घेऊन, जोरदार लढत द्यायला सुरूवात केली आहे. राज्याचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने याविषयी यश मिळवण्याचा आपला निर्धार या उद्योगाला नवसंजीवनी मिळवून देईल याची खात्री आहे.

**भारत देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना देशाच्या व महाराष्ट्र चेंबरच्या इतिहासातील सुवर्णपान म्हणजे BMM व महाराष्ट्र चेंबर यांच्या संयुक्त विद्यमाने अमेरीकेत, बिझनेस समिट चे आयोजन, ११ ते १४ ऑगस्ट २०२२ या काळात अटलांटीक सिटी मध्ये होणारी बिझनेस समिट नवीन पर्वाची सुरूवात ठरेल याचा विश्वास आहे.**




**'महाराष्ट्र राज्यस्तरीय व्यापारी परिषदेचे' दीप प्रज्वलन करून उद्घाटन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समवेत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे ,आमदार अब्दुल सत्तार, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष तनसुख झांबड, माजी उपाध्यक्ष सत्यनारायण लाहोटी, औरंगाबाद जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विजय जयस्वाल, प्रफुल्ल मालानी, घनश्याम गोयल आदि.**

# व्यापार उद्योगाला पूरक धोरण राबवणारे सरकार

## - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### जीएसटी, प्लास्टिक बंदी व एपीएमसी कायदा हे व्यापार उद्योगाचे प्रश्न प्राधान्याने सोडवणार

**छत्रपति संभाजीनगर** : राज्यातील व्यापार उद्योग व कृषी क्षेत्राला पूरक असे आमचे सरकार असून राज्यातील व्यापार उद्योगासाठी पोषक वातावरण तयार करणे आणि त्यांना चालना देण्याचे कार्य हे सरकार करेल तसेच जीएसटी , प्लास्टिक बंदी व एपीएमसी कायदा हे व्यापार उद्योगाचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याची घोषणा महाराष्ट्र चेंबरने आयोजित केलेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय व्यापारी परिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले प्रास्ताविकात महाराष्ट्र चेंबर ची माहिती दिली तसेच जीएसटी तरतुदी संबंधित अडचणी बाजार समिती कायदा प्लास्टिक बंदी यामुळे व्यापार उद्योगात होत असलेल्या अडचणींची माहिती थोडक्यात दिली. अन्नधान्यावरील जीएसटी कर रद्द करावे एपीएमसी कायद्यात बदल करण्यात यावा रद्द करण्यात यावा व प्लास्टिक बंदी स्थगिती द्यावी जोपर्यंत प्लास्टिकला पर्याय उपलब्ध होत नाही तोपर्यंत प्लास्टिक बंदीचा मिळण्याला स्थगिती देण्याची मागणी अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. तसेच महाराष्ट्र चेंबरतर्फे अमेरिकेमध्ये आयोजित 'बिजनेस कॉन्फरन्सला' उपस्थित राहण्याचे आमंत्रण मुख्यमंत्र्यांना दिले.

महाराष्ट्र चेंबर तर्फे २ ते ११ डिसेंबर २२ दरम्यान होणाऱ्या 'महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्सपो' च्या माहितीपत्रकाचे अनावरण माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते झाले.

महाराष्ट्र चेंबरने राज्यातील व्यापार उद्योगाच्या विकासासाठी राबविलेल्या उपक्रमांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विशेष अभिनंदन केले. तसेच महाराष्ट्र चेंबरने कृषी पूरक उद्योग यांच्या विकासासाठी काम करावे. राज्यातील कौशल्य विकासासाठी महाराष्ट्र चेंबरने दिलेल्या प्रस्तावाला चालना देण्यात येईल. राज्यामध्ये वाढ गुंतवणूक वाढीसाठी महाराष्ट्र चेंबरने पुढाकार घ्यावा असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.






▌ 'महाराष्ट्र राज्यस्तरीय व्यापारी परिषदेमध्ये' मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी







**महाराष्ट्र चेंबर चे वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, राजेंद्र बाठीया, उमेश शर्मा, सत्यनारायण लाहोटीए विनोद वाधवा मार्गदर्शन केले.**

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' तर्फे आयोजित राज्यस्तरीय व्यापारी महापरिषद छत्रपती संभाजीनगर सागर लॉन, जालना रोड येथे मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी,उपाध्यक्ष तनसुख झांबड, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार अब्दुल सत्तार, मराठवाडा चेंबरचे अध्यक्ष प्रफुल मालानी, महाराष्ट्र चेंबरचे माजी उपाध्यक्ष सत्यनारायण लाहोटी, औरंगाबाद जिल्हा व्यापारी महासंघाचे विजय जयस्वाल, घनश्याम गोयल आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी पुना मर्चंट चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठीया यांनी बाजार समिती कायदा याविषयी थोडक्यात माहिती दिली तसेच जीएसटी विषयी उमेश शर्मा यांनी माहिती दिली. याप्रसंगी विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

विनोद वाधवा यांनी प्लास्टीक बंदी विषयी तसेच विनित सहानी, सत्यनारायण लाहोटी यांनी मार्गदर्शन केले.

आभार प्रदर्शन महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दशरथी यांनी केले.

महाराष्ट्र व्यापारी महापरिषदेला प्रचंड मोठ्या संख्येने राज्यातून व्यापारी उपस्थित होते.

# 'जीएसटी' कर सुधारणांमध्ये 'महाराष्ट्र चेंबरने' दिलेल्या सूचनांचा विचार करू - अर्थमंत्री निर्मला सीतारामन

## 'जीएसटी दिन' समारंभाप्रसंगी ललित गांधी यांना दिले आश्वासन





GST **कर प्रणाली ५ वर्षे पूर्णाहुती निमित्त अर्थ मंत्री निर्मला सीतारमन यांना सन्मानित करताना ललित गांधी सोबत करुणाकर शेट्टी.**

जीएसटी करप्रणाली कर दात्यांसाठी आणखी सुलभ करण्याचा प्रयत्न असून महाराष्ट्र चेंबरनेदिलेल्या सूचनांचा विचार करू असे आश्वासन केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ललित गांधी यांना आश्वासन दिले.

१ जुलै रोजी जीएसटी कर प्रणालीला पाच वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त दिल्ली येथील विज्ञान भवनमध्येविशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेऊन जीएसटी कर सुधारणासंबंधी विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला. याप्रसंगी चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी उपस्थित होते.

जीएसटी करप्रणालीला ५ वर्ष पूर्णझाल्यानिमित्त आयोजित समारंभास केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, केंद्रीय अप्रत्यक्ष कर मंडळाचे चेअरमन विवेक जोहरी, केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे चेअरमन नितीन गुप्ता, अर्थ खात्याचे सचिव तरून बजाज यांच्यासह अर्थ खात्याचे, अप्रत्यक्ष कर मंडळाचे, प्रत्यक्ष कर मंडळाचे वरिष्ठ अधिकारी व देशभरातील प्रमुख उद्योजक उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या वतीने या समारंभ प्रसंगी जीएसटी करप्रणाली विषयी विशेष सादरीकरण करण्यात आले. महाराष्ट्राच्या वतीने सादरीकरण करता बनविलेल्या समितीमध्ये महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे अध्यक्ष विजय कलंत्री, फिक्की महाराष्ट्राच्या प्रमुख सुलजा फिरोदिया यांचा समावेश होता. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अनुकूल प्रतिसादाबद्दल व जीएसटी कर प्रणालीच्या यशस्वी बद्दल त्यांचे विशेष अभिनंदन केले. महाराष्ट्र चेंबरतर्फे यावेळी दिलेल्या निवेदनामध्ये जीएसटी कर प्रणालीमध्ये पुढील सुधारणा कराव्यात असे प्रामुख्याने सुचविण्यात आले. निवेदनात सुचविलेल्या मागण्या व सुधारणा पुढीलप्रमाणे -

१) ट्रान्झिट चेक दरम्यान किरकोळ तांत्रिक त्रुटींसाठी महसूल अधिकाऱ्यांकडून माल जप्त केला जात आहे.

२. राज्य जीएसटी कायद्यात योग्य बदलांची शिफारस देखील करू शकते. कराच्या दुप्पट दंड अवाजवी आहे. जाणूनबुजून कर चुकविल्याच्या सिद्ध प्रकरणांमध्येही कलम ७४ अंतर्गत अनिवार्य दंड कराच्या रकमेइतकाच असतो. त्यामुळे तांत्रिक किंवा कारकुनीचुकांसाठी दोनशे टक्के दंड तर्कसंगत करणे आवश्यक आहे.

३. अनेक जीएसटी नोंदणी नाकारली जात आहेत कारण अधिकारी घाबरत आहेत की हीबनावट नोंदणी असू शकते. म्हणून, ऑनलाइन नोंदणीकृतभागीदारी करार आवश्यक असण्यासारख्या अवास्तव आवश्यकता केल्या जातात, ज्या कायद्याच्या किंवा नियमांच्या संबंधित तरतुदींमध्ये कुठेही अनिवार्य नाही. नोंदणी प्रक्रिया तरतुदींनुसार असावी आणि कायद्यानुसार आवश्यक नसलेल्या अतिरिक्त अटींच्या बहाण्याने ती रखडली जाऊ नये.

४. जीएसटी भरण्याची प्राथमिक जबाबदारी पुरवठादाराची आहे. तथापि, जर पुरवठादाराने कर भरला नाही तर उत्तरदायित्व प्राप्तकर्त्यावर टाकण्याचाप्रयत्न केला जातो ज्यामुळे प्राप्तकर्त्याला दोनदा त्रास सहन करावा लागतो. एकदा जेव्हा तो पुरवठादाराला पैसे देतो आणि दुसऱ्यांदा जेव्हा त्याला इनपुट टॅक्स क्रेडिट रिव्हर्स करण्यास सांगितले जाते. याशिवाय प्राप्तकर्त्याला व्याज आणि दंड भरण्यास सांगितले जाऊ शकते. कर, व्याज आणि दंडासाठी प्रामुख्याने जबाबदार असलेल्या पुरवठादारावर कोणतीही कारवाई केली जात नाही. प्राप्तकर्त्याला दायित्वापासून सूट देण्यासाठी कायद्यात सुधारणा करणे आवश्यक आहे.

५. ई-पोर्टलवर सर्व चलनाची प्रत, रिटर्नची प्रत, लेखापरीक्षित खाती उपलब्ध आहेत, मग सर्व व्यवहारांसाठी चलनाची प्रत्यक्ष प्रत, रिटर्नची प्रत अनिवार्य करू नये.

६. जीएसटी टेलिफोन हेल्पलाइनमध्ये काही तांत्रिक दोष आहेत. जेव्हा करदात्याला मदतीची आवश्यकता असते तेव्हा कोणताही प्रतिसाद मिळत नाही आणि जेथे हेल्पलाइन प्रतिसाद देते, विवादांच्या बाबतीत पुढील संदर्भासाठी किंवा पुराव्यासाठी टेलिफोनिक संभाषणाची कोणतीही नोंद उपलब्ध नसते.

७. करदात्याच्या लॉगिनमध्ये दाखल केलेल्या तक्रारींची कोणतीही नोंद उपलब्ध नाही तर तक्रारींचा इतिहास करदात्याच्या लॉगिनमध्येच उपलब्ध असावा. बर्याहच न्यायालयांना पुरावे हवे असतात आणि ते GSTN वर उपलब्ध नसल्यामुळे खऱ्या करदात्यांना त्रास होतो.

८. देय तारखांना GSTN वेबसाइट क्रॅश झाल्याचे दिसले आहे आणि करदात्यांना वेबसाइट चालू होण्याची प्रतीक्षा करावी लागते जेणेकरून ते त्यांचे रिटर्न फाइल करतील अन्यथा त्यांना रिटर्न उशिरा भरण्यासाठी विलंब शुल्क भरण्याशिवाय पर्याय उरत नाही. त्याकरीता सर्व्हरची क्षमता वाढवण्याची व तंत्रज्ञान अद्यावत करण्याची गरज आहे.

९. व्यवसायादरम्यान किंवा व्यवसायाच्या प्रगतीसाठी मोफत नमुन्यांचे वितरण करणे आवश्यक असते. त्यामुळे अशा मोफत नमुन्यांचे वितरनावर जीएसटी कर आकारू नये.

१०. सध्या कर दात्याकडून कराच्या विलंबाने भरणा केल्यास १८% व्याज आकारले जाते. GST कायद्यांतर्गत व्याजदर तर्कसंगत करून ९% किंवा त्यापेक्षा कमी केला जावा.



# अन्नधान्य खाद्यपदार्थ व गुळावरील जीएसटी संबंधी नवीन नियमात आवश्यक त्या दुरुस्त्या करू - केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या शिष्टमंडळाला दिले आश्वासन



**केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांच्या समवेतच्या बैठकीत अन्नधान्यावरील जीएसटी संबंधी भूमिका मांडताना ललित गांधी, सोबत खासदार हेमंत गोडसे, संदीप भंडारी**

**नवी दिल्ली** : जीएसटी कौन्सिलच्या शिफारसी वरून केंद्र सरकारने नव्याने लागू केलेल्या अन्नधान्य,खाद्यपदार्थ व गुळा-वरील जीएसटी आकारणी संबंधी या अधिसूचनेमध्ये असलेली क्लिष्टता दूर करून सामान्य ग्राहक व छोटे व्यापारी यांना याचा बोजा होणार नाही अशा पद्धतीने आवश्यक त्या दुरुस्त्या केल्या जातील असे स्पष्ट आश्वासन केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी दिले.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर' या राज्यातील व्यापार, उद्योग व कृषी उद्योग क्षेत्राच्या शिखर संस्थेचे अध्यक्ष ललित गांधी यांनी खासदार हेमंत गोडसे व शिष्टमंडळासह अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांची भेट घेऊन नवीन केलेली कर आकारणी रद्द करण्याची मागणी केली त्याप्रसंगी ते बोलत होते.

ललित गांधी यांनी याप्रसंगी व्यापारी व ग्राहक यांच्या वतीने भूमिका मांडताना कमी प्रमाणात खरेदी करणाऱ्या सामान्य ग्राहक व छोटे व्यापारी यांच्यावर या कराचा नवीन भुर्दंड पडणार आहे. पॅकिंग न करता विकलेल्या मालावर कर आकारणी होणार नसली तरीही सध्याच्या काळामध्ये पॅकिंग न करता वस्तू



विकण्याची पद्धत जवळपास कालबाह्य झालेली आहे. आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षितता व अन्नधान्य खाद्यपदार्थांची गुणवत्ता टिकून राहण्यासाठी त्यांचे पॅकिंग करणे आवश्यक असते. त्यामुळे कराचा बोजा हा सामान्य ग्राहकाच्या वर पडणार आहे तसेच या कर रचनेमध्ये विवरणपत्रे भरण्याची प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट असल्याने छोटा व्यापारी या गोष्टींची पूर्तता करताना अडचणीत येणार आहे. खासदार हेमंत गोडसे यांनीही या कायद्यामध्ये बदल करून सामान्य ग्राहक व छोट्या व्यापाऱ्यांना दिलासा द्यावा असे आग्रही प्रतिपादन केले.

अर्थ मंत्रालयातील कर विभागाचा प्रभार असलेले अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' ने मांडलेली भूमिका योग्य असल्याचे मान्य करताना सांगितले की, केंद्र सरकारचा अशा प्रकारे अन्नधान्यावर कर लावण्याचा कोणताही प्रस्ताव नव्हता.

जीएसटी कौन्सिल मध्ये विविध राज्यांनी सातत्याने मागणी केल्याने, तसेच पूर्वीच्या कर उत्पन्नात घट झाल्याची माहिती समोर आल्याने सर्व पक्षांच्या अर्थमंत्र्यांच्या समावेश असलेल्या समितीने अशा प्रकारे कर करण्याचा प्रस्ताव सादर केला ज्याला जीएसटी कौन्सिलने मंजुरी दिल्याने कर आकारणी सुरू झाली आहे.

मात्र या कर आकारणीच्या प्रक्रियेमध्ये, यासंबंधीच्या आदेशामध्ये अनेक क्लिष्टता व विसंगती असल्याचे मंत्री महोदयांनी मान्य केले व यासंबंधी सर्व तांत्रिक बाबींचा तपशील 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' ने संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ सादर करावा अशा सूचना केल्या. यासंबंधीच्या सर्व सूचनांचा योग्य विचार करून ताबडतोब यासंबंधीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव तयार करावा अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या युवा उद्योजक समितीचे प्रमुख संदीप भंडारी, चेंबरचे दिल्ली प्रतिनिधी जे.के.जैन यांचा समावेश होता.

तत्पूर्वी ललित गांधी यांनी नवी दिल्ली येथे अन्नधान्यावरील जीएसटी रद्द करण्याच्या मागणीस अर्थ मंत्रालयकडे शिफारस करण्यासाठी जेष्ठ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री नारायण राणे, केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड, खासदार धनंजय महाडिक, खासदार श्रीकांत शिंदे, खासदार संजय मंडलिक यांच्या समवेत स्वतंत्र बैठका घेऊन याविषयी सहकार्य करण्याची मागणी केली. ज्याला सर्वच मान्यवरांनी स्वीकृती देऊन हा कर रद्द करण्याची शिफारस करू असे आश्वासन ललित गांधी यांना दिले

# महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पोला उद्योग विभाग सहकार्य करेल

## - उद्योग विकास आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे

## महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांना आश्वासन

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी उद्योग विकास आयुक्त व लघु आणि मध्यम उद्योग विभागाचे सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांची भेट घेतली.

याप्रसंगी अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरतर्फे २ डिसेंबर ते ११ डिसेंबर २०२२ असे दहा दिवस **'महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पोचे'** आयोजन करण्यात येत असून या एक्सपो बद्दलची सविस्तर माहिती दिली.

या एक्सपोमध्ये डिझाईन अभियांत्रिकी उपकरणे पुरवठा आणि सेवा इत्यादी क्षेत्रातील नवीनतम व अत्याधुनिक तंत्रज्ञानासह उत्पादनांची उत्कृष्ट श्रेणी प्रदर्शित होणार असल्याचे सांगितले. तसेच या एक्स्पोच्या माध्यमातून एक उत्तम व्यासपीठ महाराष्ट्र चेंबरने व्यापारी उद्योजकांना उपलब्ध करून देत असल्याचे सांगितले. या प्रदर्शनात विविध देशांसह भारतातील इतर राज्य सहभागी होणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी उद्योग विकास आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचे कौतुक केले आणि महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पोसाठी उद्योग विभाग सहकार्य करेल असे आश्वासन अध्यक्ष ललित गांधी यांना दिले.



**उद्योग विकास आयुक्त व लघु आणि मध्यम उद्योग विभागाचे सचिव डॉ. हर्षदीप कांबळे 'महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पोचे' माहीतीपत्रक प्रदान करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी सोबत जनरल सेक्रेटरी सागर नागरे.**




**धान्यावरील जीएसटी रद्द करण्यासाठी झालेल्या राज्यस्तरीय व्यापारी औद्योगिक संघटनांची बैठक प्रसंगी माहिती देताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष रवींद्र मानगवे, सौ. शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर**

# अन्न धान्यावरील जीएसटी विरोधी देशभर आंदोलन उभारणार - ललित गांधी

## १२ जुलै रोजी राज्यभर जीएसटी कार्यालये व जिल्हाधिकारी यांना निवेदन देणार

### प्लास्टीक बंदीला पर्याय मिळेपर्यंत मुदतवाढ व कारवाईला स्थगिती ची मागणी

### APMC चा कालबाह्य कायदा रद्द करण्याची मागणी

**मुंबई** : ४७ व्या जीएसटी काऊन्सील ने प्रस्तावित केलेल्या अन्नधान्य व खाद्य पदार्थ (नॉन ब्रँडेड) वरील ५% जीएसटी आकारणीस राज्यभरातील व्यापारी-उद्योग संघटनांनी तीव्र विरोध केला असुन, केंद्र सरकारने हा निर्णय रद्द करावा अन्यथा या प्रस्तावित कराविरोधी देशभर आंदोलन उभारण्यात येईल असा निर्णय राज्यभरातील व्यापारी उद्योजक संघटनांनी आज महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज येथे आयोजित बैठकीत घेतल्याची माहीती चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

जागतिक स्तरावरील विविध घटनांचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होत असतो परिणामी सध्या देशभर महागाई ची तीव्रता जाणवत असुन अशा काळात जीवनावश्यक अशा वस्तुंवर नवीन कर आकारणी ही महागाई वाढविणारी ठरणार आहे व याचा भार सामान्य ग्राहक व शेतकऱ्यांच्या वरही पडणार आहे असे सांगुन ललित गांधी पुढे म्हणाले की, छोट्या व्यापाऱ्यांनाही याचा विशेष त्रास होणार असुन त्यांना या कराच्या पुर्तता करणे कठीण जाणार आहे.

अन्नधान्य, डाळी या बरोबरच दुग्धजन्य पदार्थ दही, पनीर, ताक, पापड, चिरमुरे, गुळ इत्यादी वस्तुवरही हा कर प्रस्तावित केला आहे. दैनंदीन गरजेच्या या वस्तुंवर कर लावला जाणार नाही असे २०१७ साली सरकारने आश्वासित केले होते मात्र आता हा कर प्रस्तावित करून सरकारने आपलेच आश्वासन मोडले आहे. त्यामुळे देशभरातील व्यापारी वर्गाबरोबरच सामान्य ग्राहकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

तरी केंद्र सरकारने हा निर्णय तात्काळ रद्द करावा अशी मागणी करणारा ठराव आजच्या बैठकीत संमत करण्यात आला.

**प्लास्टीक बंदी :**

याबरोबरच केंद्र सरकारने सिंगल युज प्लास्टीक वापरावर घातलेली बंदी, केंद्र सरकारचा आदेश व महाराष्ट्र




# अन्नधान्य व खाद्य पदार्थावर नव्याने लावलेल्या ५% जीएसटी ला महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चा तीव्र विरोध



सरकारचा आदेश यात तफावत असुन ही तफावत दुर करावी, सुरक्षिततेसाठी आवश्यक प्लास्टीक वापराला पर्याय अद्याप मिळालेला नाही. सदर पर्यायी व्यवस्था होईपर्यंत या कायद्याच्या अंमलबजावणीला मार्च २०२३ पर्यंत स्थगिती द्यावी. राज्य सरकारने यासंबंधी संयुक्त बैठक घेऊन तरतुदींच्या संदीग्धता दुर कराव्यात तोपर्यंत राज्यभरातील व्यापाऱ्यांच्यावर सुरू असलेली कारवाई थांबविण्यात यावी अशी मागणी राज्य सरकारकडे करण्याचा निर्णय झाला असल्याची माहीती ललित गांधी यांनी दिली.

**ऐपीएमसी ॲक्ट :**

केंद्र सरकारने बाजार समित्यांच्या नियमनाचे नवीन धोरण स्विकारले असुन राज्य सरकारने त्याच्या विरोधी निर्णय घेतले आहेत. बाजार समित्यांच्या आवारा व्यतिरीक्त अन्यत्र होणाऱ्या व्यापारावर बाजार समितिला कर आकारण्याचा अधिकार नाही. अन्य राज्यातुन कर भरून आलेल्या मालावर पुन्हा महाराष्ट्रात कर आकारणी करणे नैसर्गिक न्यायाच्या विरूध्द आहे.

बाजार समित्या या शेतमालाच्या नियमनासाठी आहेत अन्य मालावर कर आकारणी करू नये. बाजार समिति या सध्याचा कायदा हा कालबाह्य झालेला असुन तो रद्द करण्यात यावा अशी मागणीही राज्य सरकारकडे करण्याचा निर्णय यावेळी घेतल्याची माहीती ललित गांधी यांनी दिली.

याबैठकीत मराठवाडा विभागातुन उमेश दाशरथी, मुंबई विभागातुन करूणाकर शेट्टी, शुभांगी तिरोडकर, पश्चिम महाराष्ट्र विभागातुन रविंद्र माणगावे, कोकण विभागातुन राजु पुनाळेकर, उत्तर महाराष्ट्र चेंबरचे कांतीलाल चोपडा, जळगांव चेंबर ऑफ कॉमर्स चे नितिन इंगळे, चिपळुण औद्योगिक संघटनेचे प्रशांत पटवर्धन, सिंधुदुर्ग व्यापारी संघटनेचे प्रसाद पारकर, कृषी समितीचे सदस्य धैर्यशील कदम यांनी आपले विचार मांडले. विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष निकेश गुप्ता , सांगली औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष संजय आराणके यांनी प्रस्तावित कर आकारणी तात्काळ रद्द करावी अशी मागणी केली. कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स चे जयेश ओसवाल यांनी याविषयी तीव्र आंदोलन उभारण्याची मागणी केली. वेस्टर्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे संदिप भंडारी यांनी सामन्य ग्राहकांपर्यंत याचे प्रबोधन व्हावे असे सांगितले. मुंबई ग्रेन डिलर्स असोसिएशनचे अध्यक्ष रमणिकभाई छेडा यांनी या कराची आकारणी छोट्या व्यापाऱ्यांचे अस्तित्व धोक्यात आणेल त्यामुळे हा रद्द झालाच पाहीजे अशी आग्रही मागणी केली.

चेंबरच्या ट्रस्ट बोर्डचे अध्यक्ष आशिष पेडणेकर यांनीही मार्गदर्शन केले. महीला उद्योजक समिती च्या चेअरपर्सन संगिता पाटील यांनी महीला उद्योजकांच्या समस्या मांडल्या.



**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अन्नधान्यावरील जीएसटी संबंधी निवेदन देऊन चर्चा करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सोबत आशिष नहार, संदीप भंडारी व अन्य मान्यवर.**

# अन्नधान्यावरील जीएसटी रद्द करण्यासंदर्भात केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या शिष्टमंडळाला दिले आश्वासन

**मुंबई** : नॉन ब्रँडेड अन्नधान्य व खाद्यपदार्थावर नव्याने लावलेल्या पाच टक्के जीएसटी संबंधात केंद्र सरकारकडे हा कर रद्द करण्यासाठी पाठपुरावा करू असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांनी ललित गांधी यांना दिले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अग्रिकल्चर या राज्याच्या व्यापार, उद्योग कृषी क्षेत्राच्या शिखर संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने आज मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन नवीन लावण्यात आलेल्या जीएसटी मुळे राज्यातील सामान्य जनतेबरोबर व्यापाऱ्यांच्या मध्ये असलेल्या तीव्र भावनांची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली व हा कर रद्द होण्याची आवश्यकता असल्याचे आग्रही प्रतिपादन केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यापारी व जनतेच्या भावनांशी आम्ही सहमत असून हा कर रद्द करावा यासाठी राज्य सरकार केंद्र शासन स्तरावर पाठपुरावा करेल अशी ग्वाही मुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांनी दिली.

तसेच व्यापार, उद्योग क्षेत्राच्या विविध प्रश्नां संबंधी चेंबर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या शिष्टमंडळा समवेत लवकरच स्वतंत्र बैठक आयोजित करू असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

यावेळी उपस्थित शिष्टमंडळात संदीप भंडारी,आशिष नहार, निरव देडिया, विकास अच्छा, दीपक मेहता, सागर नागरे यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधींनी या भेटीनंतर मुख्यमंत्र्यांच्या बरोबर झालेली चर्चा अतिशय सकारात्मक झाल्याचे सांगून राज्य शासन याविषयी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याने याविषयी समाधानकारक तोडगा निघेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

# जीएसटी, प्लास्टीक बंदी रद्द होण्यासाठी प्रयत्न करण्याची देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

## महाराष्ट्र चेंबरच्या पदाधिकाऱ्यांसमवेत स्वतंत्र बैठकीचे आयोजन करणार



दि. २० जुलै रोजी मुंबई येथे महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांची सागर निवासस्थानी भेट घेऊन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँण्ड अग्रीकल्चर चे अध्यक्ष श्री ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने भेट घेऊन अन्न धान्य व खाद्यपदार्थ वरील GST रद्द करून घेण्यासाठी केंद सरकारकडे प्रयत्न करण्याची मागणी केली.

श्री. देवेंद्र फडणवीस यांचे समवेत या संबंधी सविस्तर चर्चा झाली. व्यापारी व ग्राहकांना येणार्या अडचणी त्यांनी समजून घेतल्या व यासंबंधी आवश्यक ते प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. शिष्टमंडळात संदीप भंडारी, आशिष नहार, सागर नागरे यांच्यासह विविध पदाधिकारी सहभागी झाले होते.

## स्वागत आहे एक्सपर्ट कमिटीच्या नवीन पदाधिकाऱ्यांचे



**धैर्यशील पाटील**
चेअरमन
ट्रेड असोसिएशन समिती



**सुधिर मांडके**
चेअरमन
रिअल इस्टेट-इन्फ्रा समिती



**जितेंद्र शहा**
को-चेअरमन
युवा उद्योजक समिती



**प्रफुल्ल संचेती**
चेअरमन-अंतर्गत व्यापार समिती
उत्तर महाराष्ट्र विभाग




# महाराष्ट्रातील लघु उद्योगांना शेअर मार्केटमधून भागभांडवल उभारून देणार - ललित गांधी

## जागतिक लघु उद्योग दिनी बीएसई आणि महाराष्ट्र चेंबरमध्ये सामंजस्य करार

मुंबई - लघु व मध्यम उद्योग क्षेत्राचा देशाच्या सकल उत्पादनात २२ टक्क्याहुन अधिक वाटा असुन हे क्षेत्र सक्षम करण्यासाठी लघु व मध्यम उद्योगांची बीएसई-एसएमई च्या माध्यमातुन शेअर बाजारातून भाग भांडवल उभारूण देणार असल्याची माहीती 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (बीएसई) च्या एसएमई व स्टार्टअप विभागातर्फे जागतिक लघु उद्योग दिनानिमित्त बीएसई इंटरनॅशनल कन्वेन्शन हॉल, फोर्ट, मुंबई येथे आयोजित विशेष समारंभात भाषण करताना त्यांनी ही माहिती दिली.

बीएसई चे कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी आशिषकुमार चौहाण, मुख्य वित्त अधिकारी नयन मेहता, बीएसई-एसएमई चे प्रमुख अजय ठाकुर, सहप्रमुख आनंद चारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या समारंभात लघु व मध्यम उद्योगांना भांडवल उभारणीसाठी बीएसई - एसएमई तर्फे उपलब्ध सुविधा व या संकल्पनेची व्याप्ती वाढविण्यासाठी महाराष्ट्रातील व्यापार-उद्योग व कृषि उद्योग क्षेत्राची शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री व बीएसई मध्ये सामंजस्य करार करण्यात आला. महाराष्ट्र चेंबरच्या वतीने अध्यक्ष ललित गांधी व बीएसई तर्फे एसएमई विभागाचे प्रमुख अजय ठाकुर यांनी सामंजस्य करारावर सह्या केल्या कार्यकारी संचालक आशिष चौहाण यांच्या उपस्थितीत सामंजस्य कराराचे आदान प्रदान करण्यात आले.

ललित गांधी यांनी आपल्या भाषणात बीएसई तर्फे लघु व मध्यम उद्योगांना गेलया दहा वर्षात ४००० कोटी रूपयांचे भांडवल शेअर बाजारातुन उपलब्ध करून दिल्याबद्दल बीएसई चे अभिनंदन केले व चालु वर्ष अखेरीस १०० नवीन लघु व मध्यम उद्योगांना एसएमई शेअर मार्केट मध्ये सहभागी करून १००० कोटी रूपयांचे भांडवल या उद्योगांना उपलब्ध करून देऊ अशी घोषणा केली. तसेच महाराष्ट्र चेंबर स्वातंत्र्यपूर्व काळापासून व्यापार-उद्योगांच्या विकासासाठी कार्य करत असून राज्य, देश व जागतिकस्तरावर राज्यातील व्यापार उद्योगांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात महाराष्ट्र चेंबरने महत्वाची भूमिका बजावली असल्याचे सांगितले.

व्यापार उद्योगांच्या अडीअडचणी सोडविणे, व्यापार उद्योगांना सक्षम करणे हे चेंबरचे उद्दिष्ट असून राज्याच्या सर्वांगिण विकासासाठी महाराष्ट्र चेंबरने आपले धोरण तयार



**बीएसई-एसएमई व महाराष्ट्र चेंबर यांच्यात झालेला सामंजस्य करार हस्तांतरण करताना अजय ठाकूर, ललित गांधी, आशिष चौहान, नवीन मेहता, आशिष पेडणेकर, करूनाकर शेट्टी, सागर नागरे इत्यादी.**





केले आहे. २०२७ पर्यंत राज्यातील ३६ जिल्ह्यात कृषी क्लस्टर , महिला क्लस्टर व उत्पादन आधारित क्लस्टरची निर्मिती राज्य सरकार व केंद्र सरकारच्या सहकार्याने करण्यात येणार आहे. क्लस्टर निर्मितीमुळे स्थानिक व्यापार उद्योगांना व नवउद्योजकांना चालना मिळणार असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. आत्मनिर्भर भारत बनविण्याच्या पंतप्रधान मान. नरेंद्र मोदी यांच्या स्वप्न पूर्ण होण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे जात असल्याचे सांगितले.

या सामंजस्य करारामुळे राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना भांडवली बाजारात नोंदणी करण्यास आणि सार्वजनिक बाजारातून भांडवल उभारण्यास मदत होईल. नोंदणीकृत उद्योगांना बीएसई एसएमइ प्लॅटफॉर्ममध्ये सूचीबद्ध होण्यासाठी मदत होईल. तसेच एसएमइनी भांडवल बाजारात नोंदणी केल्यावर त्यांना भांडवल उभारण्यास मदत होऊन त्यांची आर्थिक गरज पूर्ण होईल. एसएमइनी बीएसई एसएमइ प्लॅटफॉर्ममध्ये सूचीबद्ध होऊन फायदा घ्यावा व येत्या वर्षभरात १०० एसएमइ बीएसई एसएमइ प्लॅटफॉर्ममध्ये सूचीबद्ध होतील असे आश्र्वासन अध्यक्ष ललित गांधी यांनी दिले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री चे अध्यक्ष ललित गांधी यांचा बीएसई तर्फे अजय ठाकुर यांनी स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.

बीएसई एसएमइचे प्रमुख अजय ठाकूर यांनी महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना बीएसई एसएमइ एक्सचेंजवर सूचीबद्ध होण्याचे एसएमइचे फायदे आणि इक्विटी भांडवल वाढविण्याबाबतचे ज्ञान आणि जागृकता वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. महाराष्ट्र चेंबरच्या मदतीने महाराष्ट्रातील एसएमइपर्यंत बीएसई एसएमइ एक्सचेंजचे फायदे पोचविणे व त्यांना बीएसइ एसएमइ प्लॅटफॉर्मवर सूचिबद्ध होण्यासाठी मदत करण्याचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले. तसेच बीएसइ लिमिटेड आणि महाराष्ट्र चेंबरमध्ये झालेल्या सामंजस्य करारामुळे राज्यभरातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना मदत होणार आहे. आशिष चौहाण यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राज्यातील प्रमुख उद्योजक, बँकर्स यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी विश्र्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूनाकर शेट्टी, कार्यकारणी सदस्य निलेश घरात, मनीष पाटील, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे उपस्थित होते.

# महिलांना कौशल्य विकासाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर व रुमादेवी फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार

## राज्यातील महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करणार - ललित गांधी



**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व रुमा देवी फाऊंडेशन यांच्या सामंजस्य करार प्रसंगी रुमा देवी, ललित गांधी, संगीता पाटील, आशिष पेडणेकर, कविता देशमुख, संदीप भंडारी, करुणाकर शेट्टी, आशिष गद्रे, विक्रम सिंग, सागर नागरे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्यांच्या कर्तृत्वाने प्रभावित होऊन २०१८ चा राष्ट्रीय नारी शक्ती पुरस्कारासाठी निवड केली, त्या राजस्थानच्या श्रीमती रूमादेवी ज्यांनी अल्पशिक्षित व ग्रामीण भागातील असुनही भारतीय कलाकुसर जोपासताना ३० हजारहुन अधिक महिलांना रोजगार दिला, हार्वर्ड विद्यापिठाने त्यांच्या कार्याची दखल घेऊन गौरव केला, अशा असामान्य कर्तृत्वान महिलेच्या ज्ञानाचा व कौशल्याचा फायदा महाराष्ट्रातील सर्वसामान्य महिलांना व्हावा यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर व श्रीमती रूमादेवी यांच्या दरम्यान महत्वपुर्ण सामंजस्य करार चेंबरच्या मुंबई येथील मुख्यालयात संपन्न झाला.

महाराष्ट्रातल्या सर्वच महिलांना त्यांच्या उदार निर्वाह साठी नवीन साधन उपलब्ध होईल, त्यांच्याकडे असलेल्या कलाकुसरीला वाव मिळेल आणि त्यांना नवीन प्रकारच्या कलाकृती शिकण्याचे प्रशिक्षण मिळेल व या माध्यमातून त्या स्वावलंबी होऊ शकतील या उद्देशाने महाराष्ट्र चेंबर ने रुमादेवी फाउंडेशन सोबत हा महत्त्वपूर्ण करार केलेला आहे अशी माहिती चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यातील महिला कारागिरांच्या उद्योजकतेला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यांच्या उत्पादनासाठी व्यापक बाजारपेठ मिळविण्याकरिता संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर व रुमा देवी फाउंडेशन प्रयत्नशील राहील असे श्रीमती रुमा देवी यांनी यावेळी सांगितले.



राज्यातील महिलांकरिता कौशल्य विकास प्रशिक्षण हे महाराष्ट्र चेंबर व रुमादेवी फाउंडेशन तर्फे उपलब्ध करून देण्यात येईल तसेच प्रत्येक जिल्ह्यात महिला उद्योजकांकरिता उपलब्ध असलेल्या व्यवसायाच्या संधी, राज्य व केंद्र सरकारच्या योजना याविषयी माहिती देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येईल असे महिला उद्योजक समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील यांनी सांगितले.

श्रीमती रूमादेवी यांचा महाराष्ट्र चेंबर तर्फे ललित गांधी यांनी स्मृतीचिन्ह देऊन सत्कार केला. याप्रसंगी विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, रुम ादेवी फाउंडेशनचे विक्रम सिंग, युवा समितीचे चेअरमन संदीप भंडारी, पब्लिक रिलेशन व कॉर्पोरेट कम्युनिकेशन समितीचे चेअरमन आशिष गद्रे, महिला समितीच्या को चेअरपर्सन कविता देशमुख, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे उपस्थित होते.




**राज्यभरातील GST विरोधी आंदोलनामध्ये ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर येथील छत्रपती शिवाजी चौकात निदर्शने करण्यात आली. यावेळी संजय शेटे, जयेश ओसवाल, संजय पाटील, संदिप अथणे इ. मान्यवर**

# अन्नधान्यावरील जीएसटी रद्द न केल्यास आंदोलनाची तीव्रता वाढविणार - ललित गांधी

## महाराष्ट्र चेंबरच्या बंदच्या आवाहनाला राज्यभरात उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर** : अन्नधान्य, खाद्यान्न व जीवनावश्यक वस्तूवर ५ टक्के जीएसटी कर रद्द करण्यासाठी महाराष्ट्र चेंबर तर्फे राज्यात व्यापार बंदचे आवाहनास प्रतिसाद देत सर्व जिल्ह्यांमध्ये अन्नधान्य व खाद्याने विक्रेत्यांनी कडकडीत बंद ठेवला. राज्यभरात बंद व देशात बंदला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला असून अन्नधान्यावरील जीएसटी रद्द न केल्यास आंदोलनाची तीव्रता वाढविणार असल्याचे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी कोल्हापूरमध्ये झालेल्या निदर्शनामध्ये सहभाग घेतला. राज्यभर १४ जुलै ते १७ जुलै या काळामध्ये लोकप्रतिनिधी खासदार व आमदार यांना महाराष्ट्र चेंबरच्या वतीने निवेदन देण्यात येत आहे. मुंबई, नाशिक, जळगाव, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, जालना, धुळे औरंगाबाद आदींसह सर्व जिल्ह्यात जिल्हाधिकारी व जीएसटी कमिशनर यांना व्यापारी शिष्टमंडळांनी निवेदन देऊन अन्नधान्यावरील जीएसटी कर रद्द करण्याची मागणी केली आहे. लवकरात लवकर हा प्रश्न केंद्र सरकारने निकाली काढावा यासाठीचे प्रयत्न सुरू आहेत या मागणीला सरकारने लवकर दाद न दिल्यास अन्नधान्य व खाद्यपदार्थ व्यतिरिक्त अन्य व्यापारी सुद्धा आंदोलनात उतरतील व आंदोलनाची तीव्रता वाढवली जाईल असे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.



**अन्नधान्यावरील जीएसटी रद्द करावा याकरीता कोल्हापूर जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांना निवेदन देताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स चे शिष्टमंडळ.**

यासंदर्भातल्या पुढील आंदोलनाची दिशा व धोरण ठरवण्यासाठी २४ जुलैला औरंगाबाद येथे राज्यातील व्यापारी संघटनाच्या पदाधिकाऱ्यांची महापरिषद आयोजित केल्याची माहिती ललित गांधी यांनी दिली.

# महाराष्ट्र - इंडोनेशिया मधील व्यापार संबंध अधिक दृढ व्हावेत

## - इंडोनेशियन राजदुत श्रीमती ईना कृष्णमूर्ति



**समारंभाप्रसंगी मार्गदर्शन करताना अध्यक्ष ललित गांधी दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्र चेंबरतर्फे ललित गांधी यांनी राजदूत श्रीमती ईना कृष्णमूर्ती यांना विशेष स्मृतीचिन्ह देऊन सम्मानित केले. याप्रसंगी आशिष नहार, निर्भय कटारीया, सागर नागरे इ.**

मुंबई : महाराष्ट्र व इंडोनेशियामधील व्यापार, संबंधी दृढ होण्यासाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' ने विशेष सहकार्य करावे असे प्रतिपादन इंडोनेशियाच्या भारतातील राजदूत श्रीमती ईना कृष्णमूर्ती यांनी केले.

राजदूत श्रीमती ईना कृष्णमूर्ती यांच्या भारतात नेमणूकीनंतर त्यांच्या प्रथम मुंबई दौऱ्यानिमित्त हॉटेल ताज, कुलाबा मुंबई येथे विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

भारतातील प्रमुख उद्योजक, प्रमुख औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न या समारंभाप्रसंगी महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र-इंडोनेशिया व्यापारात महाराष्ट्रातुन निर्यात वाढीसाठीच्या संधीबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

इंडोनेशिया सरकारतर्फे राजदूत श्रीमती ईना कृष्णमूर्ती यांनी ललित गांधी यांचा विशेष सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. महाराष्ट्र चेंबरतर्फे ललित गांधी यांनी राजदूत श्रीमती ईना कृष्णमूर्ती यांना विशेष स्मृतीचिन्ह देऊन सम्मानित केले.

याप्रसंगी कॉन्सुलेट जनरल ॲगस साप्तोनो, महाराष्ट्र चेंबरच्या MSME समितीचे आशिष नहार, युवा उद्योजक समितिचे निर्भय कटारीया, सागर नागरे इ. उपस्थित होते.



**इंडोनेशिया सरकारतर्फे राजदूत श्रीमती ईना कृष्णमूर्ती यांनी ललित गांधी यांचा विशेष सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.**



# इंडोनेशिया मधील औद्योगिक प्रदर्शनामध्ये 'महाराष्ट्र चेंबर' ने सहभागी व्हावे - कॉन्सुलेट जनरल ॲगस साप्तोनो

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या मुख्यालयात भेट देऊन दिले आमंत्रण



**इंडोनेशियाचे मुंबई येथील कॉन्सुलेट जनरल ॲगस साप्तोनो यांचा सत्कार करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी सोबत स्वप्नील शहा, संगीता पाटील, सागर नागरे, चंद्रकला सिसोदिया.**

इंडोनेशिया मधील जाकार्ता येथे ऑक्टोबर २०२२ या काळात संपन्न होणाऱ्या अंतरराष्ट्रीय व्यापार-उद्योग प्रदर्शनामध्ये 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' या राज्याच्या शिखर संस्थेने व्यापक शिष्टमंडळासह भेट द्यावी असे आवाहन इंडोनेशियाचे मुंबई येथील कॉन्सुलेट जनरल ॲगस साप्तोनो यांनी केले.

जाकार्ता येथील प्रदर्शनाचे आमंत्रण देण्यासाठी कॉन्सुलेट जनरल ॲगस साप्तोनो यांनी त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांसह 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' च्या मुंबई येथील मुख्यालयात भेट दिली. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी त्यांचे स्वागत केले.

ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या आंतरराष्ट्रीय व्यापार विभागाच्या कार्याची माहीती दिली व या आमंत्रणाबद्दल धन्यवाद दिले.



कॉन्सुलेट ॲगस साप्तोनो यांनी महाराष्ट्र चेंबर चे इंडोनेशिया बरोबर प्रदिर्घ काळापासून असलेले संबंध अधिक दृढ होतील अशी अपेक्षा व्यक्त केली यावेळी महाराष्ट्र चेंबरच्या MSME समितीचे आशिष नहार, युवा उद्योजक समितिचे निर्भय कटारीया, सागर नागरे आदी उपस्थित होते.

## 'इंडोनेशिया ट्रेड एक्स्पो'साठी 'महाराष्ट्र चेंबर'चे शिष्टमंडळ जाणार

१९ ते २३ ऑक्टोबर २०२२ या काळात इंडोनेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय ट्रेड एक्स्पो साठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' चे शिष्टमंडळ जाणार आहे. व्यापार, उद्योगातील आयात-निर्यातीच्या नवीन संधी यासाठी हे प्रदर्शन अत्यंत उपयुक्त आहे.

जे सदस्य या प्रदर्शन दौऱ्यावर जाऊ इच्छितात त्यांनी तात्काळ maccia**@maccia.org.in** या ईमेल वर आपला तपशील पाठवावा.

# व्यापाऱ्यांनी ई-कॉमर्स बाजारालाही प्राधान्य द्यावे !

## ललित गांधी : विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सची वार्षिक सभा उत्साहात




**विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स च्या ८८ वी वार्षिक आमसभेत मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी. व्यासपीठावर निकेश गुप्ता, संगिता पाटील व उपस्थित मान्यवर**

**अकोला** : आजच्या तंत्रज्ञान युगात ऑनलाईन ई-व्यवसाय वाढला आहे. त्यामुळे उद्योजक व व्यापाऱ्यांनीही या धकाधकीच्या व्यवस्थेत ऑनलाईन ई कॉमर्स बाजाराला प्राधान्य द्यावे. असे आवाहन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजची ८८ वी वार्षिक आमसभा खंडेलवाल भवनात मोठ्या उत्साहात संपन्न झाली यावेळी ते बोलत होते.

मावळते अध्यक्ष नितीन खंडेलवाल यांच्या अध्यक्षतेत संपन्न या सभेत प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी,जेष्ठ उद्योजक सांगली येथील रमाकांत मालु, महाराष्ट चेंबर ऑफ कॉमर्सच्या महिला शाखा संयोजिका संगीता पाटील,माजी अध्यक्ष राजकुमार बिलाला, वरिष्ठ उपाध्यक्ष निकेश गुप्ता,कनिष्ठ उपाध्यक्ष आशिष चंदाराना, मानद सचिव किशोर बाछुका, कोषाध्यक्ष निरव वोरा, सहसचिव राहुल गोयनका, निखिल अग्रवाल आदी उपस्थित होते.विदर्भ केसरी स्व. ब्रजलाल बियाणी यांच्या प्रतिमापूजनाने या वार्षिक आमसभेचा प्रारंभ करण्यात आला.

### कृषी उत्पादनावर जीएसटी लागण्याचे संकेत

आधी कृषी उत्पादनावर कोणताही जीएसटी कर आकारला जात नसे. पण आता कृषी उत्पादनावरही कर आकारणी केल्या जात असल्याचे संकेत आहेत. त्यासाठी आमचा विरोध कायम राहील, अशी माहितीही गांधी यांनी बोलताना दिली.

### महागाईचा दर अधिक होणार

गत काही दिवसांत महागाईचा दर अधिक होणार असल्याचा इशाराही गांधी यांनी दिला. युक्रेश रशियाच्या युध्दामुळे आणि कोरोना काळातील उद्योग धंदे बंद पडल्यामुळे रॉ मटेरियल मध्ये भाववाढ झाली. त्यामुळे महागाईचा दर अधिक होण्याची शक्यता आहे. अशी माहितीही गांधी यांनी दिली.



# महिलांनी व्यापार उद्योगात पुढाकार घ्यावा - ललित गांधी

## महिला उद्योगात आल्यास कुटुंबाची प्रगती होईल - संगीता पाटील




**समारंभात मार्गदर्शन करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील, निकेश गुप्ता.**

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबर तर्फे व्यापार उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र चेंबर करत असलेल्या कार्याची माहिती दिली तसेच कृषी महिला व उत्पादन आधारित क्लस्टरची निर्मिती महाराष्ट्र चेंबरतर्फे राज्यात करण्यात येणार असल्याची माहिती दिली. केंद्र व राज्य सरकार च्या व्यापार उद्योगासाठी असलेल्या विविध योजनांची ही माहिती त्यांनी दिली. महिलांनी व्यापार उद्योग सुरु करावे असे आवाहन अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

पश्चिम विदर्भातील महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी विविध व्यवसाय उद्योग सुरू करण्यासाठी असेच प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर व विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने महिला उद्योजकता परिषद खंडेलवाल भवन, अकोला येथे संपन्न झाली. परिषदेची सुरुवात विदर्भवीर स्व ब्रजलाल बियाणी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून करण्यात आली.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरच्या महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ संगीता पाटील यांनी महिला समिती तर्फे राज्यातील महिलांसाठी राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच महिलांसाठी असलेल्या सरकारी योजनांची माहिती दिली व महिलांनीही आत्मनिर्भर व्हावे स्वतःच्या पायावर उभे राहून व्यापार उद्योग सुरू करावा त्यासाठी आवश्यक ती मदत महिला समितीतर्फे करण्यात येईल असे सांगितले.

विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी महिलांना उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्यात येईल असे सांगितले.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी विदर्भ चेंबर चे माजी अध्यक्ष नितीन खंडेलवाल नवनिर्वाचित अध्यक्ष निकेश गुप्ता वरिष्ठ उपाध्यक्ष आशिष चंद्रांना महाराष्ट्र चेंबरच्या महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील जिल्हा उद्योग केंद्र अकोला चे रत्नपारखी मनीष जमदानी महिला उद्योजकता समितीच्या गजनी महाले स्नेहल ढवळे दिपाली देशपांडे उपस्थित होते. याप्रसंगी भारताच्या पहिल्या रोबोट प्रशिक्षक काजल राजवैद्य यांचा सन्मान करण्यात आला प्रमुख पाहुण्यांचा परिचय स्नेहल ढवळे यांनी करून दिला सूत्रसंचालन दिपाल देशपांडे यांनी केले तर आभार रजनी महाले यांनी मानले.

याप्रसंगी सोनल टक्कर, अंजली मुंजे, श्रद्धा कातायन, वर्षा कानेड, कविता जगताप, सुमन गावंडे, श्रावणी खंडारे, शिल्पा कुलकर्णी, वैशाली निवाने, आरती वर्मा, प्रतिभा काटे, ऋतुजा पांडे, प्राची कळमकर, रविता शर्मा, गायत्री कुळकणी, प्रिया गोंधलेकर, आरती परचुरे, स्नेहा पाठक, स्नेहल उटांगले, पूजा तेलगोटे, प्रणाली खंडारे, चंचल अग्रवाल, दीपमाला खंडेलवाल, रेखा मूलतकर, नमिता पिंपळकर, स्मिता सारडा, राजश्री सारडा, काजल पारवेकर आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.









**मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड ॲण्ड कॉमर्स च्या रौप्यमहोत्सवी वर्षाचा शुभारंभावेळी मार्गदर्शन करताना ललित गांधी, दुसऱ्या छायाचित्रात मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड चा रौप्यमहोत्सवी वर्ष केक कापुन साजरा करतना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी सोबत वर्तमान अध्यक्ष प्रफुल्ल मालाणी व्यासपीठावर उपस्थित महाराष्ट्र चेंबर चे वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, मराठवाडा विभागाचे उपाध्यक्ष तनसुख झांबड, औरंगाबाद जिल्हा व्यापारी चे विनय जयस्वाल, घनश्याम गोयल.**

# मराठवाडा चेंबर चा रौप्यमहोत्सव ही गौरवपूर्ण अभिमानास्पद बाब - ललित गांधी

## मराठवाडा चेंबर (MCTC) च्या रौप्यमहोत्सवी वर्षाचा शानदार शुभारंभ

महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष मानसिंग पवार, माजी उपाध्यक्ष सत्यनारायण लाहोटी, वर्तमान अध्यक्ष प्रफुल्ल मालाणी अशा दिग्गजांच्या नेतृत्वामुळे मराठवाड्याच्या व्यापार क्षेत्राकडे आपले गौरवपुर्ण स्थान निर्माण करण्याचा 'मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड ॲण्ड कॉमर्स' च्या रौप्य महोत्सवी वर्षाचा शुभारंभ माझ्या हस्ते होणे हा माझा सन्मान आहे असे मानतो असे गौरवोद्‌गार महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केले.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' च्या वतीने ३१ जुलै २०२२ रोजी छत्रपति संभाजीनगर येथे आयोजित राज्यस्तरीय महापरिषदेप्रसंगी 'मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड ॲण्ड कॉमर्स च्या रौप्यमहोत्सवी वर्षाचा शुभारंभ ललित गांधी यांच्या हस्ते करण्यात आला. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

मराठवाडा चेंबर चे अध्यक्ष प्रफुल्ल मालाणी यांनी याप्रसंगीच्या मनोगतात चेंबरच्या वाटवाचलीचा आढावा घेतला. तसेच चेंबरच्या स्थापनेपासुन राज्याची शिखर संस्था 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' चे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्याचे आवर्जुन नमुद केले.



**मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड ॲण्ड कॉमर्स च्या रौप्यमहोत्सवी वर्षाचा शुभारंभावेळी मार्गदर्शन करताना वर्तमान अध्यक्ष प्रफुल्ल मालाणी व्यासपीठावर उपस्थित मान्यवर**

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबर चे वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, मराठवाडा विभागाचे उपाध्यक्ष तनसुख झांबड, औरंगाबाद जिल्हा व्यापारी चे विनय जयस्वाल, उद्योगपती घनश्याम गोयल यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.




**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या कोकण विभागातर्फे महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचा जाहीर सत्कार करताना पैकाणे ग्रुपचे संचालक सुनिल पैकाणे सोबत सारस्वत बँकेचे संचालक सुनिल सौदागर, जिल्हा व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष संजय भोगाटे, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष आनंद बांदिवडेकर, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, भोसले नॉलेज सिटीचे अच्युत सावंत भोसले, सिध्दीविनायक ट्रस्टचे माजी अध्यक्ष सुभाष मयेकर, महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगिता पाटील.**

# कोकणातील व्यापारी उद्योजकांसाठी मासिआ आत्मनिर्भर अॅप - ललित गांधी

## कोकण विभागातर्फे अध्यक्ष ललित गांधी यांचा जाहीर सत्कार संपन्न

महाराष्ट्र चेंबरतर्फे राज्याच्या विकासाचा रोडमॅप तयार करण्याचे काम सुरू केले आहे. कोकण विभागाच्या विकासाकरीता सरकारच्या सहकार्याने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. कोकणाातील व्यापारी उद्योजकांनी व्यापार उद्योगांच्या विकासासाठी तंत्रज्ञानाचा अवलंब केला पाहिजे त्यासाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे मासिआ आत्मनिर्भर अॅप वर्षाअखेर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अॅपच्या माध्यमातून व्यापारी उद्योजकांना त्यांच्या उत्पादनांसाठी मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध होऊन चालना मिळणार असल्याचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले. तसेच महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना स्वतंत्र क्लस्टर तयार करून त्यांना जागा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्रयत्न सुरू आहेत. शासनाच्या योजनांचा लाभ उद्योजकांना मिळावा त्यासाठी आवश्यक प्रकल्प अहवाल मोफत व्यापाऱ्यांना तयार करून देण्याचे महाराष्ट्र चेंबरने निश्चित केले आहे. तसेच ज्या परदेशी कंपन्या आहेत, त्या कायद्यात पळवाटा काढून भारतीय व्यापाऱ्यांवर आक्रमण करत आहेत.त्यांना पायबंद घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. आता ई कॉमर्स पॉलिसीसुध्दा तयार होत आहे. त्याकरीता परदेशी आणि भारतीय कंपन्या यांना एकसारखेच नियम असणे बंधनकारक आहे. हे तंत्रज्ञान व्यापाऱ्यांना उपलब्ध व्हावे याकरीता महाराष्ट्र चेंबर काम करत आहे. महाराष्ट्राच १ कोटीपेक्षा अधिक व्यापारी असून त्यांचा व्यापार सुरक्षित रहावा यासाठी चेंबरचा प्रयत्न आहे. महाराष्ट्र चेंबर व्यापाऱ्यांच्या पाठीशी आहे. राज्याच्या सर्वांगिण विकासासाठी महाराष्ट्र चेंबरने धोरण तयार केले असून त्यावर विविध तज्ञ समित्यांच्या मार्फत काम सुरू केल्याचे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रिकल्चरच्या कोकण विभाग पदाधिकारी व कार्यकारीणी सत्कार सभारंभ कार्यक्रम कुडाळ येथील महालक्ष्मी हॉल येथे शुक्रवार दि. १२ जुन २०२२ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाप्रसंगी सत्काराला उत्तर देतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, महिला समितीच्या चेअरपर्सन




**समारंभाचे दिपप्रज्वलन करून उद्घाटन करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सोबत पैकाणे ग्रुपचे संचालक सुनिल पैकाणे, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर.**

सौ. संगिता पाटील, उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, पैकाणे समुहाचे संचालक सुनिल पैकाणे, सारस्वत बँकेचे संचालक सुनिल सौदागर, भोसले नॉलेज सिटीचे अच्युत सावंत भोसले, जिल्हा व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष संजय भोगाटे, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष आनंद बांदिवडेकर, सिध्दीविनायक ट्रस्टचे माजी अध्यक्ष सुभाष मयेकर उपस्थित होते.

महाराष्ट्र चेंबरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार पैकाणे समुहाचे संचालक सुनिल पैकाणे यांनी केला. वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी यांचा सत्कार उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर यांनी केला तर अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते सारस्वत बँकेचे संचालक सुनिल सौदागर, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष आनंद बांदिवडेकर, भोसले नॉलेज सिटीचे अच्युत सावंत भोसले, जिल्हा व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष संजय भोगाटे, सिध्दीविनायक ट्रस्टचे माजी अध्यक्ष सुभाष मयेकर यांचा सत्कार करण्यात आला. भोसले नॉलेज सिटीचे अच्युत सावंत भोसले यांना महाराष्ट्र चेंबरचे पेट्रोन सभासद प्रमाणपत्र अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रदान केले.

महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी व विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पैकाणे ग्रुपचे संचालक सुनिल पैकाणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

परिषदेमध्ये पर्यटन समितीचे चेअरमन संतोष तावडे, दत्ता भालेराव, राजन नाईक यांचा सत्कार करण्यात आला तसेच केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन, कुडाळ तालुका व्यापारी संघ, लिकर असोसिएशन, सीए असोसिएशन, मच्छिमार फाऊंडेशन, पेट्रोल पंप असोसिएशन, पर्यटन महासंघ, नर्सरी असोसिएशन, क्रेडाई असोसिएशन, रिक्षा युनियन, प्रगत शेतकरी भूषण नावर, ट्रक चालक मालक संघटना, हॉटेल चालक मालक संघटना, सिंधुदुर्ग जिल्हा पत्रकार संघ, कुडाळ तालुका पत्रकार समिती, जीएसटी ॲक्ट असोसिएशन, पीबीपीएस असोसिएशन, पारंपारीक मच्छिमार संघटना, पर्ससीन मच्छिमार संघटना, बॅ नाथ पै क्षिण संस्था, कमलेश चव्हाण, स्वरूप वाळके, अविनाश पराडकर, कमळ प्रतिष्ठान, प्रिंटर्स असोसिएशन, कुडाळ तालुका खरेदी विक्री संघ, टेलरिंग असोसिएशन, नाभिक संघटनांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

स्वागत व प्रास्ताविक उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर यांनी केले तर सूत्रसंचालन निलेश गुरव व आभार महेश मांजरेकर यांनी मानले.




सत्कार सभारंभात मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी समवेत व्यासपीठावर सारस्वत बँकेचे संचालक सुनिल सौदागर, जिल्हा व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष संजय भोगाटे, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष आनंद बांदिवडेकर, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर पैकाणे ग्रुपचे संचालक सुनिल पैकाणे, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, भोसले नॉलेज सिटीचे अच्युत सावंत भोसले, सिध्दीविनायक ट्रस्टचे माजी अध्यक्ष सुभाष मयेकर, महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगिता पाटील, उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर.






सत्कार समारंभात मार्गदर्शन करतांना विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, पैकाणे ग्रुपचे संचालक सुनिल पैकाणे, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष चंद्रकांत पुनाळेकर.




महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते पेट्रोन सभासदत्वाचे प्रमाणपत्र भोसले नॉलेज सिटीचे अच्युत सावंत भोसले यांना प्रदान करण्यात आले.



कुडाळ तालुका व्यापारी संघातर्फे विविध मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांना देण्यात आले.



# कोकणात महिलांना व्यापार उद्योगांचे प्रशिक्षण देणार -ललित गांधी

## कोकणातील महिलांचा उत्साह प्रेरणादायी - संगीता पाटील

महाराष्ट्र चेंबरतर्फे महिलांना त्यांच्या व्यापार-उद्योगांच्या विकासासाठी, नविन व्यापार उद्योग सुरू करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरची महिला समिती कार्य करत आहे. राज्यभर दौरे करून महिला समितीतर्फे महिलांना व्यापार उद्योग करण्यास प्रोत्साहन व मदत करण्यात येत आहे. महिलांना व्यापार उद्योग करण्यास प्रोत्साहन देणे, त्यांना तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम सुरू असून कोकणातील महिलांना सरकारच्या विविध योजनांची माहिती देऊन व्यापार उद्योग करण्यासाठी मदत करण्यात येणार असून महिला क्लस्टर तयार करून त्यांना जागा देण्याचेही महाराष्ट्र चेंबरचे प्रयत्न सुरू असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबरच्या महिला समितीतर्फे महिलांसाठी उत्कृष्ट काम सुरू असून महिलांनी व्यापार उद्योग सुरू करावा, त्यांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि कोकणात महिला क्लस्टरच्या माध्यमातून कोकणातील महिलांना उद्योगासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे गौरवास्पद कार्य महाराष्ट्र चेंबरची महिला समिती करत असून जिल्हा बँकेतर्फे सहकार्य करण्याचे आश्वासन जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. प्रज्ञा ढवण यांनी दिले.

महाराष्ट्र चेंबरच्या महिला समितीतर्फे उद्योजकता विकास परिषद दि. १० जुन २०२२ रोजी कुडाळ येथील महालक्ष्मी हॉल येथे संपन्न झाली.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, महिला समितीच्या चेअरपर्सन सौ. संगिता पाटील, को-चेअरपर्सन सौ. कविता देशमुख,सिंधुदुग जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका सौ. प्रज्ञा ढवण, सावंतवाडी नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा अन्नपूर्णा कोरगांवकर, कोकण जिल्हा बँक अध्यक्ष मनिष दळवी, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक श्रीपाद डमाळे, पर्यटन समितीचे चेअरमन संतोष तावडे, उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर उपस्थित होते.

सुरवातीला महाराष्ट्र चेंबरच्या महिला समितीच्या चेअरपर्सन सौ. संगिता पाटील यांनी प्रास्ताविक करतांना महाराष्ट्र चेंबरतर्फे राज्यातील महिलांनी केवळ घरात न राहता व्यापार उद्योगात करावा यासाठी २०२२ ते २०२७ या कालावधीसाठी महिला धोरण तयार करण्यात आल्याचे सांगितले. या धोरणातंर्गत महिलांना प्रोत्साहन देणे, शासकीय योजनांची माहिती देणे, तरूणींसाठी कौशल्य प्रशिक्षणाच्या विविध सुविधा व प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बँकामार्फत कर्ज सुविधा कशा मिळतील यासह विविध माहितीपर कार्यक्रम व महिला समितीमार्फत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. मुंबई, नाशिक नंतर




**महिला उद्योजकता विकास परिषदेत मार्गदर्शन करतांना महिला समितीच्या चेअरपर्सन सौ. संगिता पाटील, समवेत व्यासपीठावर जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. प्रज्ञा ढवण, सावंतवाडी नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा महिला समितीच्या को-चेअरमन सौ. कविता देशमुख, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष चंद्रकांत पुनाळेकर**



**सिंधुदुर्ग जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. प्रज्ञा ढवण यांचा सत्कार करतांना महिला समितीच्या चेअरपर्सन सौ. संगिता पाटील, सोबत को-चेअरमन सौ. कविता देशमुख**





**महिला उद्योजकता विकास परिषदेत मार्गदर्शन करतांना जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. प्रज्ञा ढवण, सावंतवाडी नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सौ. अन्नपूर्णा कोरगांवकर**

कोकणात महिला समितीचा हा कार्यक्रम होत असून महिला व तरूणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महिला व तरूणींनी स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी चेंबर प्रयत्नशील असून चेंबरच्या उपक्रमात महिलांनी सहभागी व्हावे असे आवाहन सौ. संगिता पाटील यांनी केले.

सावंतवाडी नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सौ. अन्नपूर्णा कोरगांवकर यांनी चेंबरच्या महिला समितीचे उपक्रम स्तुत्य असून कोकणात घरगुती व्यवसाय करणाऱ्या महिलांना चेंबरच्या उपक्रमाचा फायदा होईल. त्यांना प्रोत्साहन देणे, व्यवसायासाठी आर्थिक मदत व उत्पादनांना बाजारपेठ मिळाल्यास महिलांची उन्नती निश्चित होईल. त्यासाठी सावंतवाडी नगरपरिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र चेंबरच्या महिला समितीतर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना मदत करण्याचे आश्वासन उपनगराध्यक्षा सौ. अन्नपूर्णा कोरगांवकर यांनी दिले.

जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक श्रीपाद डमाळे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. महिला उद्योजकता परिषदेस मोठ्या प्रमाणात महिला उपस्थित होत्या.

# महाराष्ट्रातील रेल्वेच्या प्रश्नांसंबंधी संयुक्त बैठक आयोजित करू - केंद्रीय मंत्री दर्शना जरदोश

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांना आश्वासन




केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री नाम. दर्शना जरदोश यांना रेल्वेसंबंधी मागण्यांचे निवेदन देताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, आम प्रकाश आवाडे, राहुल आवाडे, सतिश कोष्टी इ. मान्यवर

**कोल्हापूर** : महाराष्ट्रातील रेल्वेसंबंधी विविध मागण्या व प्रलंबित प्रश्नांसंबंधी आगामी अधिवेशन काळात दिल्ली येथे संयुक्त बैठक आयोजित करू असे आश्वासन रेल्वे व वस्त्रोद्योग राज्यमंत्री नाम. दर्शना जरदोश यांनी ललित गांधी यांना दिले.

रेल्वे व वस्त्रोद्योग राज्यमंत्री नाम. दर्शना जरदोश दोन दिवसाच्या कोल्हापूर जिल्हा दौऱ्यावर आल्या असता इचलकरंजी येथे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नाम. दर्शना जरदोश यांची भेट घेऊन रेल्वेच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून निवेदन सादर केले त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

ललित गांधी यांनी राज्यातील रेल्वेच्या विविध प्रश्नांची मांडणी करताना विविध मेट्रो प्रकल्पांचे क्रियान्वयन, माल वाहतुकीसंबंधी सेवा विस्तार, कोकण विभागातुन पार्सल सेवा सुरू करणे, कोल्हापूर-वैभववाडी मार्गाच्या कामाची प्रत्यक्ष सुरूवात यांसह कोल्हापूर-अहमदाबाद सेवा दररोज सुरू करणे व गाडीचा मार्ग आबु रोड पर्यंत विस्तारीत करणे. कोल्हापूर - मुंबई सुपरफास्ट रेल्वे सुरू करणे, पुण्याहुन गुजरातकडे जाणाऱ्या गाड्या कोल्हापूरहुन रवाना कराव्यात.

कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद रेल्वे स्टेशन मॉडेल रेल्वे स्टेशन म्हणुन विकसित करावीत.



नाशिक-पुणे रेल्वेमार्ग सुरू करणे या प्रमुख मागण्या मांडल्या. महाराष्ट्र चेंबरच्या रेल्वे विषयक समिती ने तयार केलेला सेवा विस्तार अहवाल ही यावेळी त्यांनी मंत्री महोदया यांच्याकडे सुपूर्त केला.यावेळी महाराष्ट्र चेंबरचे गव्हर्निंग काऊन्सील सदस्य आम. प्रकाश आवाडे, नितिन धुत, अरूण ललवाणी, खास. संजयकाका पाटील, राहुल आवाडे, सतिश कोष्टी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

# व्यापाऱ्यांच्या हितासाठी सरकारबरोबर भांडावे लागणार - ललित गांधी

## कन्झ्युमर प्रॉडक्टस फेडरेशनचे ११ वे राज्यस्तरीय अधिवेशन उत्साहात संपन्न




**महाराष्ट्र कंझ्युमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्युटर्स फेडरेशनचे ११ वे अधिवेशनाप्रसंगी दीपप्रज्वलन करून उद्घाटन करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी समवेत महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष हेमंत राठी, प्रफुल जैन, उद्योजक कुमार बेंबू, धैर्यशील पाटील, जीएसटीचे सहाय्यक आयुक्त हरिश्चंद्र गांगुर्डे, अतुल पटेल, संदीप लोया, आयबीएम पुणे मार्केटिंग फॅक्लटी अँड इंटरफेस प्रमुख अभय पाठक.**

व्यापाऱ्यांसमोर अनेक आव्हाने आहेत. ऑनलाईनमुळे छोट्या व्यापाऱ्यांची मोठी अडचण झाली आहे. त्यात आता अन्नधान्यांवर ५ टक्के जीएसटी कर आकारण्यात येणार आहे. अन्नधान्यांवर ५ टक्के जीएसटी कर रद्द करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने एक दिवसाचे व्यापार बंदचे आंदोलन केले. अन्नधान्यावर ५ टक्के जीएसटी कर लागू करण्याचे सर्कुलर काढले. सर्क्युलरबाबत तज्ञांचे मत मागविले असता प्रत्येक तज्ञाचे मत वेगवेगळे मिळाले असून संभ्रमाचे वातावरण आहे. यासाठी सरकारबरोबर भांडावे लागणार आहे. महाराष्ट्र चेंबरने केंद्र सरकारकडे ऑनलाईन व्यापारासाठी पॉलीसी तयार करण्याची मागणी केली असून तसे कामही सुरु झाले आहे. ऑनलाईनच्या स्पर्धेत टिकण्यासाठी व व्यापाऱ्यांना व्यापार वृद्धीसाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे अँप उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. महाराष्ट्र चेंबरच्या २५ विविध समित्या असून ट्रेड असोसिएशन समितीच्या चेअरमनपदी धैर्यशील पाटील यांची नियुक्ती केल्याचे जाहीर केले तसेच महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष हेमंत राठी यांच्या हस्ते धैर्यशील पाटील यांच्या सत्कार करण्यात आला.

आयबीएम पुणे मार्केटिंग फॅक्लटी अँड इंटरफेस प्रमुख अभय पाठक, महाराष्ट्र कंझ्युमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्युटर्स फेडरेशनचे ११ वे अधिवेशन रविवार दि. १७ जुलै २०२२ रोजी कालिदास कला मंदिर येथे संघटनेचे अध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

याप्रसंगी व्यासपीठावर उद्घाटक व मार्गदर्शक महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष हेमंत राठी, प्रफुल जैन, उद्योजक कुमार बेंबू, धैर्यशील पाटील, जीएसटीचे सहाय्यक आयुक्त हरिश्र्चंद्र गांगुर्डे, अतुल पटेल, संदीप लोया, आयबीएम पुणे मार्केटिंग फॅक्लटी अँड इंटरफेस प्रमुख अभय पाठक उपस्थित होते.

महाराष्ट्र कंजूमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्युटर्स फेडरेशनचे ११ वे अधिवेशन नसून सुशिक्षित हमालांचे अधिवेशन आहे. अन्नधान्यांवरील ५ टक्के जीएसटी रद्द करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने एक दिवस व्यापार बंदचे लाक्षणिक आंदोलन केले. या सरकारला आंदोलनाची भाषा कळते की काय असा प्रश्नक पडला आहे. खरं तर पंतप्रधान वारंवार इज ऑफ डूइंग बिजनेसबाबत सांगत असतात मात्र इज ऑफ डूइंग बिजनेस कागदावरच असून प्रत्यक्ष परिस्थिती उलट आहे. गेल्या काही वर्षांमध्ये आपण बघितलं तर पुन्हा एकदा इन्स्पेक्टर राज येते की काय अशा प्रकारचे एक वातावरण तयार झाल्यासारखे चित्र आहे. जीएसटी करामध्ये





**महाराष्ट्र कंझ्युमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्युटर्स फेडरेशनचे ११ वे अधिवेशनाप्रसंगी मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.**

आतापर्यंत खूप दुरुस्त्या झाल्या असून एखाद्या कायद्यामध्ये किती वेळा दुरुस्त्या कराव्या यालाही काही मर्यादा नाही. जीएसटी कौन्सिलने ४७ व्या बैठकीत अन्नधान्यावर ५ टक्के जीएसटी कर लागू करण्याचे सर्कुलर काढले. सर्क्युलरबाबत तज्ञांचे मत मागविले असता प्रत्येक तज्ञाचे मत वेगवेगळे मिळाले असून संभ्रमाचे वातावरण असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

नाशिक धान्य किराणा घाऊक व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रफुल्ल संचेती, नाशिक धान्य किराणा घाऊक व्यापारी संघटनेचे माजी अध्यक्ष महेंद्र पटेल आदिंसह महाराष्ट्र कंझ्युमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्युटर्स फेडरेशनचे ११ वे अधिवेशनास व्यापारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## स्वागत आहे एक्सपर्ट कमिटीच्या नवीन पदाधिकाऱ्यांचे



**विरेन बाविशी**
को-चेअरमन
फायनान्स, बँकींग समिती




**ॲड. दिपक पटवर्धन**
को-चेअरमन
फायनान्स, बँकींग समिती



**अश्विन मेहाडीया**
को-चेअरमन
ट्रेड असोसिएशन समिती



**किशोर जैन**
को-चेअरमन
एज्युकेशन ॲण्ड ट्रेनिंग समिती



# THE BIG FACT
## (PART 1)

**In the universe are billions of galaxies;
In our galaxy are billions of planets,
But there is Only One Earth.**



**Dr. Dhanashri Hardas**
Chairperson,
Environment Committee

**50 years back in 1972, for the first time people voiced from the global platform for Environment. We are speaking about Stockholm Conference. It was this event that gave us 5th June as World Environment Day that was executed two year hence in 1974. Each World Environment Day has a theme that helps the global community to plan and act in this field. After 50 years once again the theme Only One Earth resonates.**

**Lets us know the grave environmental facts -**

- We are using the equivalent of 1.6 Earths to maintain our current way of life, and ecosystems cannot keep up with our demands.
- The gap between what we need to spend to adapt and what we are actually spending is widening.
- There is a 50 per cent chance that global warming will exceed 1.5°C in the next two

decades.


- Methane, the primary component of natural gas, is responsible for more than 25 per cent of the warming we are experiencing today.
- The climate crisis causes extreme weather events that kill or displace thousands and result in economic losses measured in the trillions.
- Investments in renewable energy can deliver high economic multipliers, have high potential to crowd-in private investment and are an important step on the road to economy-wide decarbonization.
- Even under the most optimistic scenario where net-zero is reached by 2050, global warming will continue in the short to medium term, potentially levelling off at 1.5°C above pre-industrial levels.
- Ecosystem degradation affects the well-being of an estimated 3.2 billion people, or 40 per cent of the world's population.
- Restoring 15 per cent of converted lands while stopping further conversion of natural ecosystems can prevent 60 per cent of expected species extinctions.
- Every year, we lose ecosystem services worth more than 10 per cent of our global economic output
- Around one-third of the world's farmland is degraded, about 87 per cent of inland wetlands worldwide have disappeared since 1700 and one-third of commercial fish species are overexploited.
- Food systems are responsible for 80% of biodiversity loss, and 80% of all agricultural land is for livestock and its feed, while providing only 20% of calories.
- Air pollution causes about 7 million premature deaths every year, one in nine of all deaths. Nine out of 10 people breathe unclean air, making it the most significant environmental health risk of our time.
- The most recent SDG monitoring cycle revealed that over 3 billion people are at risk because they don't know enough about the health of surface and groundwater resources.
- Under a business-as-usual scenario, annual plastic waste entering aquatic ecosystems could nearly triple from 9-14 million tons in 2016 to 23-37 million tons by 2040.
- The total global economic cost of marine plastic pollution on tourism, fisheries and aquaculture is estimated to have been US$6-19 billion in 2018.
- From 1950 to 2017, an estimated 9.2 billion tons of plastic was produced, 7 billion tons of which has become waste.

Climate change, nature and biodiversity loss, and pollution and waste –evidence that Earth is "code red" is all around us and growing more ominous every day.

Time is running out, and nature is in emergency mode. We need urgent action to address these pressing issues, making "Only One Earth" and its focus on living sustainably in harmony with nature, as pertinent as ever.

The way out of this dilemma is to transform our economies and societies to make them inclusive, fair, and more connected with nature. We must shift from harming the planet to healing it.

This calls for collective, transformative action on a global scale to celebrate, protect and restore our planet.






# Restrictions on cash transactions in Income Tax Act are as under:

1. As per Sec 13A, if donation is received by political parties in cash exceeding Rs 2000/-, exemption shall not be available to them.
2. Deduction U/S 35AD shall not be allowed if cash payment exceeds Rs 10,000/-.
3. Deduction of insurance premium U/S 36, health insurance premium U/S 80D, contribution to political parties U/S 80GGB and GGC shall not be allowed if payment is made in cash.
4. Payment of expenses in cash exceeding Rs 10,000/- shall not be allowed as adeduction (Sec 40A(3)).
5. Payment for capital expenses in cash exceeding Rs 10,000/- shall be ignored for calculation of actual cost of asset (Sec 43(1)).
6. Presumptive profit will be deemed at 6% instead of 8% in respect of the amount of total turnover or gross receipts which is received through the banking channel. (Sec 44AD).
7. Contribution to charitable institutions in cash exceeding Rs 2,000/- shall not be eligible for deduction U/S 80G.
8. No deduction shall be allowed U/S 80GGA if contribution is paid in cash in excess of Rs.10,000/-.
9. Banks/ Post office will deduct tax @ 2% on the cash payment to any person on the amount exceeding 1 Cr (If return not filed 2% - Rs. 20 Lacs to Rs. 1 Crore and 5% thereafter). Sec 194N.
10. Penalty U/S 269SS and 269T of equal amount for accepting and repaying loan in cash of Rs 20,000/- or more.
11. Penalty U/S 269ST of equal amount for receipt of Rs 2 Lacs or more in cash from a person in a day or in respect of a single transaction or relating to one event or occasion.

***Compiled by : CA Rajesh Chand, Nashik***
***Cell : 9370315995, chand1503@gmail.com***



**महाराष्ट्र चेंबरतर्फे राज्यस्तरीय कौशल्य विकास परिषदेच्या अहवाल आरोग्य व कौशल्य विकास मंत्री ना. राजेश टोपे यांना सादर करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी समवेत उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, महिला समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील, चंद्रकला सिसोदिया, स्वप्निल शाह, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे.**

# व्हीटीपी संस्थांच्या अडचणी तात्काळ सोडविण्यात येतील

## - कौशल्य विकास व आरोग्य मंत्री राजेश टोपे

## 'महाराष्ट्र स्किल मिशन अँबेसिडर' म्हणून महाराष्ट्र चेंबरची नियुक्ती करणार

**मुंबई** : राज्यातील व्हीटीपी संस्थांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या अडचणी प्राधान्याने सोडविल्या जातील असे आश्वासन कौशल्य विकास व आरोग्य मंत्री ना. राजेश टोपे यांनी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांना दिले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने व्हीटीपी संस्थांच्या अडचणी संदर्भात कौशल्य विकास व आरोग्य मंत्री ना. राजेश टोपे यांची भेट घेतली याप्रसंगी ते बोलत होते.

आरोग्य व कौशल्य विकास मंत्री राजेश टोपे यांनी व्हीटीपी संस्थांच्या अडचणी जाणून घेऊन व्हीटीपी संस्थांचा अभ्यासक्रम अंतिम करण्यासाठी राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात येईल व महाराष्ट्र चेंबर या समितीचा स्थायी सदस्य असेल, तसेच व्हीटीपी संस्थांच्या समस्या सोडविण्याकरिता कौशल्य विकास विभागासमवेत संयुक्त बैठक आयोजित करून व्हीटीपी संस्थांच्या अडचणी प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन आरोग्य व कौशल्य विकास मंत्री ना. राजेश टोपे यांनी चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांना दिले. तसेच महाराष्ट्र चेंबरतर्फे कौशल्य विकासासाठी सुरु असलेले उपक्रमांची माहिती समजवून घेऊन राज्यात कौशल्य विकासाच्या प्रचार आणि प्रसारासाठी महाराष्ट्र स्किल मिशन अँबेसिडर म्हणून महाराष्ट्र चेंबरची नियुक्ती करण्यात येईल असे आरोग्य व कौशल्य विकास मंत्री ना. राजेश टोपे यांनी शिष्टमंडळाला सांगितले.

या प्रसंगी महाराष्ट्र चेंबरतर्फे झालेल्या राज्यस्तरीय कौशल्य विकास परिषदेचा अहवाल अध्यक्ष ललित गांधी यांनी आरोग्य व कौशल्य विकास मंत्री राजेश टोपे यांच्याकडे सादर केला. अहवालाचे अवलोकन करून श्री. राजेश टोपे यांनी राज्यात कौशल्य विकासासाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे सुरु असलेल्या उपक्रमांचे कौतूक केले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कौशल्य विकास समिती व महिला समितीच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात कौशल्य विकासाकरिता वेगवेगळे प्रोग्राम, सेमिनार्स, वर्कशॉप्स राबवण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच महिलांकरीता कौशल्य विकास व उद्योजकता विकास प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत असून महिला क्लस्टरची निर्मिती करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच व्हीटीपी संस्थांच्या अडचणी मांडल्या त्यात प्रामुख्याने

१) (MSSDS) कडून २०१७ पासून प्रलंबित देयके अदा करणे.

२) लाभार्थ्यांच्या प्लेसमेंटसाठी मुदतवाढ मिळावी.

३) परीक्षा वेळेवर घेण्यात याव्यात व निकाल वेळेवर अपलोड करण्यात यावा.

४) करोना काळामध्ये संस्था बंद असताना (MSSDS) ने संस्थांना कारणे दाखवा व कारवाईच्या दिलेल्या नोटीसांवरील कारवाई स्थगित करून त्यावर मार्ग काढावा.

५) VTP संस्थांना एकच नोंदणी प्रक्रिया निश्चित करण्यात यावी व त्याचे प्रशिक्षण देण्यात यावे आदि अडचणी मांडून कौशल्य विकास प्रभावीपणे होण्यासाठी व्हीटीपी संस्थांच्या अडचणी सोडविण्याची मागणी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केली.

शिष्टमंडळात उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, महिला समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील, चंद्रकला सिसोदिया, स्वप्निल शाह, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे होते.






इचलकरंजी येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी टेक्स्टाईल सिटी च्या पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर चे अध्यक्ष ललित गांधी व इतर मान्यवर

# महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातुन इचलकरंजीत 'वुमेन्स क्लस्टर' ची स्थापना करू- ललित गांधी

इचलकरंजी येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी टेक्स्टाईल सिटी यांच्या वतीने प्रतीवर्षीप्रमाणे रोटरी व्होकेशनल सर्व्हिस आणि युथ सर्व्हिस अंतर्गत सन २०२१-२२ चा व्होकशनल ॲवॉर्ड सोहळा तसेच युवा गौरव सोहळा इचलकरंजी येथे संपन्न झाला.

सदर कार्यक्रमासाठी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, इचलकरंजी शहर हे माझ्या आवडीचे ठीकाण असुन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या माध्यमातुन मला काही करता आले तर माझ्या पदाचा सन्मान झाल्यासारखे होईल. त्यांनी चेंबर ऑफ कॉमर्सच्या माध्यमातनु वेगळा टेक्स्टाईल विभाग, महिलांसाठी स्पेशल क्लस्टरची स्थापना व इचलकरंजी शहरामध्ये चेंबर ऑफ कॉमर्स ची शाखा सुरू करण्याची ग्वाही दिली. तसेच त्यांनी रोटरी हा पुरस्कार अत्यंत सन्मानाचा असुन या पुरस्कारासाठी योग्य निवड केली जाते. सर्व पुरस्कार प्राप्त उद्योजकांचे कार्य अतिशय चांगले असून त्यांनी भावी काळात उत्तरोत्तर प्रगती करावी व चेंबर ऑफ कॉमर्सच्या माध्यमातुन फायदा करून घ्यावा असे आवाहन केले.

**रोटरी व्होकेशन ॲवॉर्ड आणि युवा गौरव कार्यक्रम संपन्न**

यावेळी शुभेच्छापर मनोगत व्यक्त करताना डीसीसी फॉर व्होकेशन ॲवॉर्ड रो. बाळासाहेब देवनाळ व सहाय्यक प्रांतपाल रो. नागनाथ बसुदे यांनी रोटरीच्या कार्याचा गौरव केला.

पुरस्कामध्ये सौ. माया भंडारे, पूनम पाटील, स्नेहल डाळ्या, शशिकला कवडे, नजमा शेख यांना तर युवा गौरव पुरस्कार डॉ. वरूण बाफणा, विशेष सेवा पुरस्कार ओमप्रकाश बजाज यांना प्रदान करण्यात आला.







महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते पुरस्कार वितरण






**महाराष्ट्र सरकारच्या कौशल्य विकास संस्थेचे प्रमुख श्री. दिपेंद्र कुशवाह (IAS) यांच्याशी चर्चा करताना अध्यक्ष ललित गांधी सोबत महिला समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील, स्वप्निल शाह, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे व सौ. चंद्रकला सिसोदिया.**

# कौशल्य विकास संस्थांची पूर्वीची देयके देण्याबरोबर महाराष्ट्र चेंबरच्या अन्य प्रस्तावाव सहकार्य करू - दिपेंद्र कुशवाह

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स बरोबरच्या बैठकीत ग्वाही

**मुंबई** : महाराष्ट्रातील कौशल्य विकास संस्थांची प्रलंबित देयके लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न करू त्याचबरोबर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे कौशल्य विकास क्षेत्रासाठी सुचिवलेले प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करू असे आश्वासन महाराष्ट्र सरकारच्या कौशल्य विकास संस्थेचे प्रमुख श्री. दिपेंद्र कुशवाह (IAS) यांनी दिले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महाराष्ट्र कौशल्य विकास संस्थेच्या मुख्यालयात याविषयी महाराष्ट्र चेंबरच्या विनंतीवरून आयोजित विशेष बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

प्रारंभी अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्रातल्या कौशल्य विकास संस्थांच्या विविध प्रश्नांचा आढावा घेतला. गेली ५ वर्षे अनेक संस्थांची कोट्यावधी रूपयांची देयके तांत्रिक कारणास्तव प्रलंबित आहेत. त्यामुळे अशा संस्थांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाल्याचे सांगितले.

व्हिटीपी असोसिएशनचे अध्यक्ष स्वप्नील शहा यांनी व्हीटीपी संस्थांच्या अडचणी, तांत्रिक त्रृटी याबाबत सविस्तर चर्चा केली. संगीता पाटील, श्री. चौधरी यांनी कौशल्य विकास संस्थांच्या वास्तविक समस्यांचा उहापोह केला.

बैठकीप्रसंगी महाराष्ट्र चेंबर तर्फे राज्यातील कौशल्य विकास धोरणासंबंधी सुचनांचा अहवाल सादर केला तसेच श्री. दिपेंद्र कुशवाह यांचा सन्मान केला.



**एमपीएससी चे चेअरमन किशोरराजे निंबाळकर यांना चेंबर पत्रिकेचा अंक देताना अध्यक्ष ललित गांधी सोबत महिला समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील, स्वप्निल शाह, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे व सौ. चंद्रकला सिसोदिया.**

# महिलांसाठी चेंबरचे कार्य कौतूकास्पद

## सहकार्य करण्याचे आश्वासन - आमदार सौ. सीमा हिरे

### नाशिकमध्ये महिला क्लस्टरच्या कामास सुरवात महिलांनी सहभागी व्हावे - ललित गांधी




**उत्तर महाराष्ट्र महिला सभासदांच्या बैठकीत मार्गदर्शन करतांना आमदार सौ. सीमाताई हिरे, समवेत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन कांतीलाल चोपडा, पर्यावरण समितीच्या चेअरपर्सन डॉ. धनश्री हरदास, को-चेअरमन संजय सोनवणे.**

महाराष्ट्र चेंबरतर्फे महिलांना त्यांच्या व्यापार-उद्योगांच्या विकासासाठी, नवीन व्यापार उद्योग सुरु करण्यासाठी महिला समीती कार्य करत आहे. महिलांना व्यापार उद्योग करण्यासाठी प्रोत्साहन देणे व त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी महिला समितीतर्फे विविध उपक्रम राबवत आहे. महाराष्ट्र चेंबरच्या २०२२ -२०२७ या कालावधीत राज्यात महिला, कृषी आणि उत्पादनाधारित असे ३६ क्लस्टर तयार करण्यात येणार आहे. नाशिकमध्ये महिला क्लस्टर सुरु करण्यासाठी काम सुरु केले असून सर्व महिलांनी या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

महाराष्ट्र चेंबरच्या महिला समितीतर्फे महिलांसाठी अतिशय चांगले कार्य सुरु असून महिलांना व्यापार उद्योग सुरु करणे, त्यांच्या उत्पादनांसाठी बाजारपेठ तयार करून देणे आणि आता महिला क्लस्टर तयार करण्यात येणार आहे अतिशय कौतुकास्पद कार्य असून या कार्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्र्वासन आमदार सौ. सीमा हिरे यांनी दिले.

नाशिक तसेच उत्तर महाराष्ट्र विभागातील विविध जिल्ह्यातील वेगवेगळ्या क्षेत्रात व्यापार उद्योगांमध्ये कार्यरत असणाऱ्या महिला उद्योजिका तसेच नव्याने व्यापार-उद्योगात प्रवेश करू इच्छिणाऱ्या महिलांसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या 'महिला उद्योजकता समितीच्या' वतीने दिनांक ३० मे रोजी सकाळी ११ वाजता बाबुभाई राठी सभागृह, सारडा संकुल, नाशिक येथे विशेष संवाद बैठक संपन्न झाली.

चेंबरच्या महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील यांनी प्रास्ताविक करतांना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे राज्यातील महिलांना उद्योगांमध्ये प्रोत्साहन देणे यासाठी २०२२ ते २०२७ या कालावधीचे महिला धोरण तयार करण्यात आले असून या धोरणांची सविस्तर माहिती दिली. युवतींसाठी कौशल्य प्रशिक्षणाच्या विविध सुविधा उपलब्ध करण्यात येत असून याविषयीची माहिती दिली. महिलांना व्यापार उद्योगासाठी असलेल्या सरकारी योजनांची माहितीचे कार्यक्रम व महिला समितीमार्फत राबविण्यात येणार असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. महिलांनी महाराष्ट्र चेंबरच्या महिला समितीच्या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन केले.

महिला उद्योजिकाना प्रोत्साहनासाठी आयोजित केलेल्या या विशेष बैठकीत नाशिक जिल्ह्यातील व उत्तर महाराष्ट्र विभागातील सर्व महिला उद्योजकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांचा सहभाग महत्वाचा - अमित टिल्लू

## आज आपण निसर्गाचे रक्षण केले तर निसर्ग उद्या आपले रक्षण करेल - ललित गांधी

## शासकीय यंत्रणांनी तांत्रिकदृष्ट्या सबळ होणे गरजेचे - सौ. देवयानी फरांदे




**मसिआ इनकॉन टॉक्समध्ये मार्गदर्शन करतांना अध्यक्ष ललित गांधी, आमदार सौ. देवयानी फरांदे, पर्यावरण समितीच्या चेअरपर्सन डॉ. धनश्री हरदास, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन कांतीलाल चोपडा, किरण चव्हाण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे वरिष्ठ प्रादेशिक अधिकारी अमर दुरगुले.**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अॅग्रिकल्चरतर्फे सोमवार दि.३० मे २०२२ रोजी पद्मश्री बाबुभाई राठी सभागृहात येणाऱ्या पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मसिआ इनकॉन टॉक्स संपन्न झाले.

पर्यावरण समितीच्या चेअरपर्सन डॉ. धनश्री हरदास यांनी प्रास्ताविकात पर्यावरण दिवसाचा इतिहास आणि महत्त्व व पर्यावरण यासाठी भविष्यातील कृती याची सविस्तर माहिती दिली.

प्रमुख वक्ते जैविक विविधता तज्ञ अमित टिल्लू यांनी जैविक विविधता फूड चेन, नाशिकचे पर्यावरण व काल आज आणि उद्या याबाबत उदाहरणासह माहिती दिली. पर्यावरण संवर्धन करण्यासाठी सर्वांचा सहभाग महत्वाचा असल्याचे टिल्लू म्हणाले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी चेंबरच्या माध्यम ातून ३ तीन महिन्यात दहा लाख वृक्षारोपण करण्याबरोबरच या क्षेत्रातील विविध उपक्रम राबविण्यात येतील. भगवान महावीरांनी २६०० वर्षापूर्वीच जीवनशैली कशी असावी याबाबतचे मार्गदर्शन केले आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने आज पर्यावरण संवर्धन करण्याची गरज संपूर्ण जगात निर्माण झाली आहे. महाराष्ट्र चेंबर पर्यावरणासाठी गांभीर्याने काम करत असून विकास करताना कुणाचे नुकसान होऊ नये हे बघून काम करत आहे. आज आपण निसर्गाचे रक्षण केले तर उद्या निसर्ग आपले रक्षण करेल असे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले.

आमदार सौ देवयानी फरांदे यांनी पर्यावरणाविषयी चौफेर चर्चा करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ महानगरपालिका प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी तांत्रिकदृष्ट्या सबल होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले तसेच फूड चैन व बायो मॅगनिफिकेशन यांचा संदर्भ घेत आज नागरिकांनी काय केले पाहिजे यासंदर्भात प्रभावीपणे आपले मतप्रदर्शन केले.

मसिआ इनकॉन टॉक्समध्ये किरण चव्हाण यांनी ग्रीन बिल्डिंग व ग्रीन कॅम्पस कसे असावे आणि त्यासाठी आपण काय केले पाहिजे याविषयावर मार्गदर्शन केले. महानगरपालिकेचे पर्यावरण विभागाचे शहर अभियंता शिवकुमार वंजारी यांनी पाण्याच्या संदर्भात विशेष बाबी व सीईटीपी संदर्भात माहिती दिली. देवांग जानी यांनी गोदावरी नदी येथील अंतर्भूत असलेले जलस्रोत जीवंत करण्याचे कार्य करत असून या प्रक्रियेची माहिती दिली. तसेच गोदावरी नदीपात्रातील आणखी जलस्रोत जीवंत करण्यासाठी मांडणी केली. पर्यावरण तज्ञ शेखर गायकवाड यांनी शहराच्या व गावाच्या वस्ती भागात झाडे कुठली व कशी लावावी त्यांचे संगोपन कसे करावे. डोंगराळ भागात झाडे कशी लावावीत याची माहिती उदाहरणासह दिली. महानगरपालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी झाडांची लागवड आणि झाडे कापणे याची माहिती दिली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे वरिष्ठ प्रादेशिक अधिकारी अमर दुरगुले यांनी सीईटीपीची नितांत गरज असून सीईटीपीचे काम पूर्ण होण्यासाठी उद्योजक व संघटनांनी पुढाकार घ्यावा. सर्वांचा सहभाग महत्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

स्वागत व सूत्रसंचालन उत्तर महाराष्ट्र चेअरमन कांतीलाल चोपडा यांनी केले तर आभार प्रदर्शन को-चेअरमन संजय सोनवणे यांनी केले. कार्यक्रमात महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य, उद्योजक मोठया संख्येने उपस्थित होते.

# एमएसएमईंनी सुरक्षेसाठी ऑरगनायझेशन सिक्युरिटी पॉलीसी करावी - डॉ. हेरॉल्ड डिकॉस्टा

## जागृत व्हा, शिक्षित आणि सुरक्षित व्हा - तन्मय दिक्षित






**सेमीनारमध्ये मार्गदर्शन करतांना डॉ. हेरॉल्ड डिकॉस्टा आणि सायबर संस्कारचे तन्मय दिक्षित, महाराष्ट्र चेंबरच्या एमएसएमई समितीचे चेअरमन आशिष नहार, उत्तर महाराष्ट्र शाखा को-चेअरमन संजय सोनवणे.**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर, एसएमई व्हेंचर आणि कॅस्परस्की लॅब इंडिया प्रा. लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सिक्युरिटी : सेफगार्डिंग ऑर्गनायझेशन्स फ्रॉम थ्रेट याविषयावर दि. १५ जुन २०२२ रोजी हॉटेल एक्सप्रेस इन येथे सेमीनार संपन्न झाले.

सेमीनारमध्ये सायबर सुरक्षा महामंडळाचे अध्यक्ष डॉ. हेरॉल्ड डिकोस्टा, कॅस्परकी लॅब इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे रिजनल बिझनेस मॅनेजर गौतम जयस्वाल, कॅस्परकी लॅब इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे प्रिसेल्स मॅनेजर राजू वेरान्ना, गौतम जयस्वाल, सायबर संस्कारचे तन्मय दिक्षित, उत्तर महाराष्ट्र शाखा को-चेअरमन संजय सोनवणे, एमएसएमई समितीचे चेअरमन आशिष नहार यांनी मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र चेंबरचे उत्तर महाराष्ट्र शाखा को-चेअरमन संजय सोनवणे यांनी महाराष्ट्र चेंबरची माहिती दिली. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात व्यापार उद्योग, कृषी क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबरचे कार्य सुरू आहे. राज्यात व देशात राज्यातील व्यापार उद्योगांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगितले. देशात जागतिक स्तरावर व्यापार उद्योग करतांना इंटरनेटचा वापर आवश्यक झाला असून त्याशिवाय काम होत नाही. तसेच सायबर गुन्हे वाढत असून मोबाईल, कॉम्प्युटर वापरतांना तसेच आर्थिक व्यवहार करतांना काळजी घेणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार व नवनविन तंत्रज्ञानाचा फायदा घेत जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात सायबर क्राईम वाढले आहे. आजचे सायबर सिक्युरिटी विषयावरील सेमीनार व तज्ञ मार्गदर्शकांकडून मिळणाऱ्या माहितीने उपस्थित सर्वांना फायदा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

महाराष्ट्र चेंबरच्या एमएसएमई समितीचे चेअरमन आशिष नहार यांनी एमएसएमइ समितीमार्फत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात एमएसएमईसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. जागतिक स्तरावर राज्यातील उद्योगांना संधी उपलब्ध करून देण्याचे काम चेंबर करत आहे. तसेच गेल्या दोन वर्षात नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणण्यात यशस्वी झाल्याचे सांगितले. सायबर सिक्युरिटी महत्वाचा विषय असून लहान, मध्यम व मोठ्या कंपनीतील अधिकाऱ्यांनी आयटी सोल्युशन्सची अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे. सिस्टिम व डेटा संरक्षणासाठी योग्य सुरक्षा उपाय करणे व सायबर सुरक्षा आव्हाने यासाठी सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी एमएसएमईंनी रोडमॅप तयार करणे आवश्यक असल्याचे आशिष नहार यांनी सांगितले.

कार्यक्रमास महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारीणी सदस्य संजय राठी, मिलिंद राजपूत, ललित नहार, रवि जैन, मनिष रावल, सीजी पॉवरचे विशाल नवसे, सुहास सराफ, कैलास चावला, सचिव विनी दत्ता, सहायक सचिव अविनाश पाठक आदिंसह उद्योजक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

# प्लास्टीक -पेपर उत्पादने बंदी, जीएसटी यासारख्या विषयावर विदर्भातील व्यापाऱ्यांनी संघटीत व्हावे - ललित गांधी

## चंद्रपुर येथे फेडरेशन व महासंघातर्फे भव्य व्यापार परिषदेचे आयोजन





**चंद्रपुर :** व्यापारी वर्गाच्या व्यापार विकासासाठी, व्यापारातील नवनवीन संधीसाठी तसेच प्लास्टीक, पेपर कप प्लेट बंदी, अन्न धान्यवरील जीएसटी, जीएसटी मधील त्रुटी यारख्या विषयांवर न्याय मिळविण्यासाठी विदर्भातील सर्व व्यापारी तसेच व्यापारी, औद्योगिक संघटनांनी संघटीत व्हावे व राज्याच्या शिखर संस्थेच्या प्रयत्नांना व लढ्याला बळ द्यावे असे आवाहन 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

फेडरेशन ऑफ ट्रेड, कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री तथा चंद्रपुर व्यापारी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ललित गांधी यांच्या चांदा ते बांदा संघटनात्मक दौऱ्यानिमित्त चंद्रपुर येथे आयोजित भव्य व्यापार परिषदेप्रसंगी ते बोलत होते.

फेडरेशन ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज चे अध्यक्ष रामकिशोर सारडा, चंद्रपुर व्यापार मंडळ चे अध्यक्ष रामजीवन परमार, फेडरेशन ऑफ विदर्भ इंन्डस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष मधुसुदन रूंगठा, चेंबरच्या युवा उद्योजक समितीचे संदिप भंडारी आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी दोन्ही संस्थांच्या वतीने ललित गांधी यांचा सत्कार करणेत आला.

# एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन चंद्रपुर चे उद्योग विकासामध्ये महत्वपूर्ण योगदान - ललित गांधी

## ललित गांधी यांच्याकडून वृक्षारोपणासह विविध कामांची पाहणी

चंद्रपुर सारख्या नैसर्गिक संपत्तीने समृध्द जिल्ह्यात उद्योगांच्या विकासासाठी एमआयडीसी इंडस्ट्री असोसिएशन चे कार्य कौतुकास्पद असुन अध्यक्ष मधुसुदन रूंगठा व त्यांचे सर्व सहकारी अभिनंदनास पात्र आहेत असे गौरवोद्गार महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी काढले. ललित गांधी यांच्या चंद्रपूर दौऱ्याप्रसंगी इंडस्ट्री असोसिएशन ने त्यांनी भेटीसाठी आमंत्रित केले होते त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी असोसिएशन च्या कार्यालयाच्या आवारात ललित गांधी व अन्य मान्यवरांचा हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी असोसिएशनतर्फे निर्माण होत असलेल्या सार्वजनिक सुविधांची पाहणी ललित गांधी यांनी केली व प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. याप्रसंगी





असोसिएशन चे अध्यक्ष मधुसुदन रूंगठा, फेडरेशन ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज चे अध्यक्ष रामकिशोर सारडा, रामजीवन परमार, अजय कपुर, उत्तमकुमार डाखेरे, रेहमान पटेल, प्रदिप बुक्कावार, सुनिल कुलकर्णी, आदि मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर तर्फे ललित गांधी यांनी पुकारलेल्या आंदोलनाच्या पहिल्या टप्प्याला महाराष्ट्रातुन प्रतिसाद

## १२ जुलै रोजी राज्यभर जीएसटी कार्यालये व जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आली




जळगांव चे खासदार उन्मेष पाटील यांना निवेदन देऊन चर्चा करताना संगीता पाटील, दिलीप गांधी, नितीन इंगळे, स्वरुप लुंकड, प्रविण पगारिया, रमेशचंद्र जैन, प्रणव मेहता, दीपक सूर्यवंशी




धुळे व्यापारी महासंघ, धुळे ग्रेन पल्सेस एंड जागरी मर्चेंट्स असो व खानदेश चेंबर ऑफ़ कॉमर्सतर्फे डॉ सुभाषजी भामरे, खासदार धुळे , केशवजी पाठक, सहायक आयुक्त केंद्रीय वस्तु व सेवा कर विभाग, भानुदासजी माळी, उपायुक्त राज्य वस्तु व सेवा कर विभाग यांना नितिन बंग, अरुण नावरकर, पवन अग्रवाल, ईश्वर लोढ़ा, अजय बरडीया, नंदकिशोर सोनार यांनी निवेदन दिले.




अन्नधान्य व खाद्यपदार्थ वरील प्रस्तावित जीएसटी कर रद्द करावा या मागणीचे एक निवेदन जीएसटी उपायुक्त संतोष श्रीवास्तव यांनाजालना जिल्हा व्यापारी महासंघातर्फे देण्यात आले त्याप्रसंगी महासंघ,अडतिया व किराणा असोसिएशनचे पदाधिकारी




महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन कांतीलाल चोपडा, को-चेअरमन संजय सोनवणे, कार्यकारी सदस्य राजाराम सांगळे, नाशिक धान्य घाऊक किराणा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रफुल संचेती, नाशिक धान्य किरकोळ किराणा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सुरेश मंत्री, माजी अध्यक्ष महेंद्र पटेल, शेखर दशपुते, सहसचिव प्रभाकर गाडे, कार्याध्यक्ष संतोष राय, भिका लाल कोठावदे, महेंद्र डी. पटेल निवृत्ती शिरोडे, नाना जाधव भास्कर पवार आदीं.



जिल्हाधिकारी गंगाधरण डी यांच्याकडे ५ टक्के जीएसटी रद्द करण्याची मागणी निवेदनाद्वारे अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष सुधाकर देशमुख यांनी केली. उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन कांतीलाल चोपडा, को चेअरमन संजय सोनवणे, नाशिक धान्य घाऊक किराणा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रफुल संचेती, नाशिक किरकोळ किराणा संघटनेचे माजी अध्यक्ष शेखर दशपुते, राजाराम सांगळे, दत्ता भालेराव, कैलास पाटील, मिलिंद राजपूत, ललित नहार, प्रभाकर गाडे, कार्याध्यक्ष संतोष राय.





अन्न धान्य व खाद्य पदार्थावर नव्याने प्रस्तावित ५% जी एस् टी वाढीचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा यासाठी मा. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या नावे दत्तात्रय भडकवार, उप जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांना ललित गांधी अध्यक्ष मासिया यांच्या सहीने निवेदन देण्यात आले. तसेच प्रशांत कोरे, असिस्टंट कमिशनर जी एस टी सिंधुदुर्ग यांनाही निवेदन देऊन चर्चा करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे कोकण उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर, गव्हर्निंग काउंसिल मेंबर्स अशोक सारंग, भालचंद्र राऊत, मनोज वालावलकर आणि पर्यटन समिती सदस्य राजन नाईक उपस्थित होते.


## स्वागत आहे एक्सपर्ट कमिटीच्या नवीन पदाधिकाऱ्यांचे




**पंकज सारडा**
को-चेअरमन
MSME (ADMN) समिती




**प्रकाश मालाडकर**
को-चेअरमन
MSME (PR) समिती



**मधुसुदन रूंगठा**
को-चेअरमन
MSME (PR) समिती



**उदय गायकवाड**
को-चेअरमन
पर्यावरण समिती




**धनंजय बेले**
को-चेअरमन
इंडस्ट्रीअल असो. समिती

# जीएसटी लढ्यासंबंधीचा प्रगतीचा आढावा....

अन्नधान्यावरील जीएसटी संबंधी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अग्रिकल्चर' च्या वतीने अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली युवा उद्योजक समितीचे चेअरमन संदीप भंडारी, चेंबरचे दिल्ली प्रतिनिधी जे.के.जैन यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने दिनांक २७ जुलै रोजी नवी दिल्ली येथे व्यापाऱ्यांची भूमिका मांडून सरकारने हा निर्णय रद्द करावा यासाठी केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी, केंद्रीय मंत्री नारायणजी राणे केंद्रीय अर्थराज्यमंत्री (बँकिंग) भागवत कराड, खासदार श्रीकांत एकनाथ शिंदे, खासदार हेमंत गोडसे, खासदार संजय मंडलिक, खासदार धनंजय महाडिक, या मान्यवरांच्या समवेत बैठका घेतल्या. सर्व मान्यवरांनी आपली भूमिका व्यवस्थित समजून घेतली. व यातल्या अडचणी दूर कशा करता येतील, छोट्या व्यापाऱ्यांना यातून दिलासा कसा देता येईल, यासंदर्भात उपाययोजना करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. सर्वच मान्यवरांनी अतिशय सकारात्मक प्रतिसाद दिला.




**केंद्रीय सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग मंत्री नाम. नारायण राणे, केंद्रीय वित्त राज्यमंत्री नाम. भागवत कराड**

**केंद्रीय सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग मंत्री नाम. नारायण राणे, केंद्रीय वित्त राज्यमंत्री नाम. भागवत कराड**







**मान. खासदार हेमंत गोडसे (नाशिक), मान. खासदार श्रीकांत एकनाथजी शिंदे, मान. खासदार धनंजय महाडीक (कोल्हापूर), मान. खासदार संजय मंडलीक (कोल्हापूर)**

## विद्यार्थ्यांनी कौशल्य विकास करणे आवश्यक - सौ. शुभांगी तिरोडकर

## विद्यार्थ्यांसाठी गेट सेट गो फॉर इंटरप्रेनिअरशीप कार्यक्रम संपन्न







**विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र चेंबरच्या उपाध्यक्ष शुभांगी तिरोडकर समवेत सौ. कविता देशमुख, सौ. दीपा राऊत, डॉ. अर्चना, स्टर्लिंग इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे संचालक डॉ. प्रशांत गुंडावार, डॉ. दीपा बोबडे उपस्थित होते. दुसऱ्या फोटोत महाराष्ट्र चेंबरच्या उपाध्यक्ष शुभांगी तिरोडकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतांना डॉ. अर्चना. समवेत सौ. कविता देशमुख, सौ. दीपा राऊत, स्टर्लिंग इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे संचालक डॉ. प्रशांत गुंडावार.**

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व इनरव्हील क्लबतर्फे सोलापूरचा पर्यावरण रोडमॅप याविषयावर पॅनल चर्चासत्र संपन्न






**महाराष्ट्र चेंबरच्या पर्यावरण समितीच्या चेअरपर्सन डॉ. धनश्री हरदास, आयडब्ल्यूसी सोलापूरच्या सचिव, शिक्षण तज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती भारती शहा, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचे अधिकारी राहुल माने आदि**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँण्ड अॅग्रीकल्चर आणि इनरव्हील क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूरचा पर्यावरण रोडमॅप याविषयावर पॅनल चर्चासत्र दिनांक १४ जुलै २०२२ रोजी संपन्न झाले.

सुरुवातीला महाराष्ट्र चेंबरच्या पर्यावरण समितीच्या चेअरपर्सन डॉ. धनश्री हरदास यांनी राज्याच्या विकासात महाराष्ट्र चेंबरची भूमिका, पर्यावरण समितीचे कार्य व भविष्यातील योजना याविषयी सविस्तर माहिती दिली. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी पर्यावरण समितीच्या माध्यमातून राज्यात विविध महत्वपूर्ण उपक्रम राबविण्याचे जाहिर केल्याचे डॉ. धनश्री हरदास यांनी सांगितले.

सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, बाकलीवाल ट्युटोरियल सोलापूर शाखेतील प्राध्यापक विकास कुमार, कृषी तज्ञ प्राजक्त चांदणे, रोटरी सेंट्रल आरटीएनचे अध्यक्ष जाजू, आयडब्ल्यूसी सोलापूरच्या सचिव, शिक्षण तज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती भारती शहा, बांधकाम व्यावसायिक मेहुल कन्स्ट्रक्टशनचे हरीश पटेल, अभियांत्रिक उद्योगाचे भूषण शहा, मुंबईतील रोटेरियन विदुला या सर्वांनी आपले मनोगत व्यक्त केले. आय डब्ल्यू स्टारलेट आणि हार्मोनीचे अध्यक्ष श्वेता आणि लक्ष्मी, हेमा पटेल यांच्यासह नागरिक उपस्थित होते.


तुमचं कोकणातलं समुद्रालगतचं घर.. आता गुहागर बिच जवळ
सुधीर मांडके ग्रुप घेऊन येत आहे
सुमारे ३०० एकर जागेवर १००० बंगलो प्लॉट्स
एक भव्य व सुसज्ज पर्यटन प्रकल्प.
MANDKE LIGHTHOUSE
India's First Sea-Side Tourism Township
अहो गुहागरच्या सुप्रसिद्ध ७ किमी लांबीच्या "व्हाईट सँड बिच" जवळ घर घेण्याची संधी पुन्हा येणार नाही.!
मुंबई ते दाभोळ / पालशेत बोटीने किंवा हेलिकॉप्टरने सुध्दा येऊ शकता.
कुटुंबातील प्रत्येक सदस्यासाठी इथे आहे खास आकर्षण..
वेलनेस सेंटर
स्टुडिओ अपार्टमेंट्स
प्लॉट्स विथ बंगलो
स्टार हॉटेल
कोकण क्लब
शॉपिंग स्ट्रीट
प्रकल्पाची वैशिष्ठ्ये
• १८ मीटर रूंद मुख्य रस्ते
• १२ मीटर रूंद अंतर्गत रस्ते
• 'श्रीमंत तळे' पेशव्यांचे
• मनोरंजन क्लब
• २ लॉन टेनिस कोर्टस
• जिम, हेल्थ क्लब, स्पा
• आकर्षक प्रवेशव्दार, शॉपिंग स्ट्रीट
• बिलीयर्डर्स, कॅरम व बुद्धीबळ इ. खेळ
• लहान मुलांसाठी खेळायला प्ले झोन
• स्विमिंग पुल, चेंजिंग रुम, लॉकर्सची सुविधा
• टेबल टेनिस रूम, लायब्ररी
• वेलनेस सेंटरमध्ये स्टीम व सोना बाथ
• लक्झरी हॉटेल, रेस्टॉरंट, बार, मल्टीपर्पज हॉल
• पंचतारांकित व बजेट हॉटेल्स
• ५ मिनिटांच्या अंतरावर पालशेत जेट्टी
• जवळच अनेक प्रसिद्ध मंदिरे
क्लब मेंबरशीप फ्री !!
Ph: 99229 65505, 98905 27648, 70300 41843 | info@sudhirmandke.com | www.mandkelighthouse.com
संपर्कः सुधीर मांडके ग्रुप
साईटचा पत्ता : असगोली गांव, तालुका गुहागर, जिल्हा रत्नागिरी.
MAHARERA NO. P52800014361
maharera.mahaonline.gov.in

# प्लास्टीक, पेपर कप प्लेट, द्रोण, पत्रावळी, नॉन वुव्हन बॅग्ज या क्षेत्रावरील बंदीमुळे हवालदील उद्योजक व्यापाऱ्यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ला घातले साकडे

केंद्र सरकार चे आदेश क्र. जीएसआर ५७१(इ), दि. १२ ऑगस्ट २०२१, महाराष्ट्र सरकारचे आदेश क्र. प्लास्टीक/२०२१/५कर२५ दि. २८ मार्च २०२२, महाराष्ट्र सरकारचे आदेश क्र. २६१, दि. १५ जुलै २०२२. अन्वये महाराष्ट्रात (प्लास्टीक, पेपर कप प्लेट, द्रोण, पत्रावळी, नॉन वुव्हन बॅग्ज) या उत्पादनांवर घातलेल्या बंदीमुळे राज्यातील या व्यवसायातील २ लाखाहुन अधिक उद्योजक व्यापारी व २० लाखाहुन अधिक कर्मचारी उघड्यावर येण्याचा धोका निर्माण झाला आहे. या गंभीर अशा जीवन-मरणाच्या प्रश्नातुन मार्ग काढणेसाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' ने पुढाकार घ्यावा अशी विनंती चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांना विविध संस्था संघटनांनी निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्र चेंबरने याचे गांभीर्य लक्षात घेऊन चेंबरमध्ये 'प्लास्टीक, पेपर कप प्लेट, द्रोण, पत्रावळी, नॉन वुव्हन बॅग्ज' या उत्पादनांसाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याची घोषणा ललित गांधी यांनी केली. व या प्रश्नी न्याय मिळवून देण्यासाठी राज्य व केंद्र सरकारकडे प्रयत्न करण्याची ग्वाही दिली.

यासंबंधी, ऑल महाराष्ट्र असोसिएशन ऑफ नॉन वुव्हन, महाराष्ट्र राज्य पेपर कप मॅन्युफॅक्चरींग असोसिएशन, पूणे नॉन वुव्हन असो., कोल्हापूर द्रोण पत्रावळी असोसिएशन, कोल्हापूर प्लास्टीक मॅन्यु. असो, मराठवाडा पेपर कप मॅन्यु. असो., इत्यादी संघटनांनी ललित गांधी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन याप्रश्नी न्याय मिळवून द्यावा अशी आग्रही मागणी केली.



**औरंगाबाद पेपर कप मॅन्यु. असोसिएशनचे सचिन धुत व अन्य पदाधिकारी**




**कोल्हापूर प्लास्टीक मॅन्यु. असो. चे अध्यक्ष संग्राम कुंभार, समर्थ शेळके, अर्जुन पाटोळे, संदिप माने आदि.**



**इचलकरंजी पेपर प्रॉडक्टस असोसिएशनचे भगवान पाटील, हरीश शिंदे, राजेश निमकर व अन्य**



**महाराष्ट्र नॉन वुव्हन मॅन्यु. असोसिएशन चे घनश्याम झंवर, सोमनाथ बियाणी, रविंद्र झंवर, सुर्यकांत रूकडे आदि.**

# भारतीय मानक ब्युरो च्या महाराष्ट्र राज्य समितिवर ललित गांधी यांची निवड

मुंबई : भारतीय मानक ब्युरो (ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्स) भारत सरकारच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत भारतीय उत्पादनांचा दर्जा निश्चित करणाऱ्या भारतीय मानक ब्युरो च्या महाराष्ट्र राज्य समितिवर व्यापार, उद्योग विभागाचे प्रतिनिधि म्हणुन 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' चे अध्यक्ष ललित गांधी यांची निवड झाली आहे.

राज्याचे मुख्य सचिव या समितिचे अध्यक्ष असुन गृह विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव, उद्योग विभागाचे प्रधान सचिव, विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव, उद्योग संचालनायाचे विकास आयुक्त, तंत्र शिक्षण विभागाचे संचालक, वैधमापन शास्त्र विभाग नियंत्रण, विद्युत मंडळाचे अध्यक्ष हे समितीचे सदस्य असुन अन्न व नागरी पुरवठा विभागचे सचिव समितीचे सदस्य सचिव म्हणुन काम पाहणार आहेत.

भारत सरकारने नव्याने बंधनकारक केलेल्या सुवर्ण आभुषणांचे हॉलमार्क संबंधी पुर्ण राज्यात सक्षम यंत्रणा उभारणे यासंबंधी सर्व संबंधित घटकांत जागृती निर्माण करणे या प्रमुख उद्देशांसह या समितिच्या कार्यकक्षेत नवीन भारतीय मानक तयार करण्यासाठी क्षेत्रे निश्चित करणे, भारतीय मानकांचे अनुपालन करण्यासाठी उत्पादने, प्रक्रीया आणि प्रणाली निश्चित करणे, भारत सरकारने जारी केलेल्या गुणवत्ता नियंत्रण आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे, मानकांबाबत ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे उपाय सुचविणे, राज्यात एक दर्जे दार इको सिस्टिम तयार करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, या शिवाय भारतीय मानक ब्युरो मानकांबाबत अन्य सुचना सुचविणे या विषयांचा समावेश आहे.

सुवर्ण आभुषणांच्या हॉलमार्क सक्तीनंतर नळाद्वारे केला जाणाऱ्या पिण्याच्या पाणी पुरवठ्यासंबंधी मानके निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू असुन याविषयी समिती कार्य करणार आहे.

ललित गांधी या निवडीविषयी बोलताना म्हणाले की, आत्म निर्भर भारत, मेक इन इंडिया या संकल्पनांच्या अंमलबजावणी नंतर आंतरराष्ट्रीय व्यापारात वृध्दि झाली असुन भारतीय उत्पादने गुणवत्तेच्या बाबतीत स्पर्धेत टिकतील. यासाठी विशेष लक्ष देणार असल्याचे सांगुन ललित गांधी पुढे म्हणाले की सुवर्ण आभुषणांच्या हॉलमार्क संबंधी येणाऱ्या अडचणींबाबत प्रधान्याने लक्ष देणार असुन याबाबत योग्य तोडगा काढण्याचा प्रयत्न करणार आहे.




**महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व उपाध्यक्ष तनसुख झांबड यांनी जालना येथे भेट दिली याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा जालना जिल्हा व्यापारी महासंघातर्फे सत्कार करतांना विनित सहानी, शाम लोया व पदाधिकारी. दुसऱ्या छायाचित्रात जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी समवेत उपाध्यक्ष तनसुख झांबड, जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे विनित सहानी व पदाधिकारी.**

# राज्याच्या व्यापार, उद्योगासह आर्थिक प्रगतीसाठी विधिमंडळाचा प्रभावी उपयोग

## - ॲड. राहुल नार्वेकर, विधानसभा अध्यक्ष

### महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे निवडीबद्दल सत्कार




**महाराष्ट्र राज्याचे नुतन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना महाराष्ट्र चेंबर च्या कार्याची माहीती देऊन चर्चा करताना अध्यक्ष ललित गांधी, संदिप भंडारी आदि.**

महाराष्ट्राच्या व्यापार, उद्योगासह एकुणच आर्थिक प्रगतीसाठी विधिमंडळाचा प्रभावी वापर करू यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज या राज्यातील शंभर वर्षाची परंपरा असणाऱ्या शिखर संस्थेला सहभागी करून घेऊ असे प्रतिपादन विधानसभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला त्याप्रसंगी ते बोलत होते.

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी चेंबरच्या कार्याची माहीती नवनिर्वाचित अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिली. यावेळी चेंबरचे जीसी मेंबर संदीप भंडारी, विकास अच्छा, नीरव देढीया इ. उपस्थित होते.

# स्टेट बँकेचे ग्राहकांशी जिव्हाळयाचे नाते जोडण्याचा प्रयत्न कौतुकास्पद - लतिल गांधी






**स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोल्हापूर विभागाच्या वतीने आयोजित SME Utsav कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. व्यासपीठावर SBI SME Pune Div. GM. श्री मनोज वर्मा. AGM प्रशांत जोशी. जवाहर साखर कारखाना चे MD मनोहर जोशी. यावेळी AGM प्रशांत जोशी यांनी ललित गांधी यांचा सत्कार केला.**





# भावपूर्ण श्रद्धांजली



"महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री " चे माजी अध्यक्ष श्री. सुभाष दांडेकर यांच्या पत्नी चेंबरच्या "महिला समिति" च्या माजी चेअरपर्सन

**श्रीमती रजनी सुभाष दांडेकर**

यांच्या दुःखद निधनामुळे दांडेकर कुटुंबियांवर झालेल्या आघातात संपूर्ण "महाराष्ट्र चेंबर" परिवार सहभागी आहे.






# ।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।



महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारीणी सदस्य श्री. संदिप भंडारी यांचे काका **श्री. स्वरूपचंदजी उत्तमचंदजी भंडारी** (वय ७०) यांचे दु:खद निधन झाले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर, आयोजित

## महाराष्ट्राच्या विकासातील व्यापार क्षेत्राचा सहभाग

# भव्य महाराष्ट्र व्यापारी महापरिषद, छत्रपति संभाजीनगर

रविवार, दि. ३१ जुलै २०२२
















**Date of Publish : 12th August 2022** **Page No. 1 to 52**
WPP License No.: NMR/Tech/WPP-21/Nashik/2022-23 License to Post without prepayment. Posted on 12th August 2022 at Nashik
Head office Regd. No: NSK/RNP-82/2021-2023. Registered with Regr. of News Papers for India, Delhi under Regd. No. 20803/71




हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक विनी दत्ता यांनी मालक महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर यांचेकरीता विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स, सातपूर, नाशिक-७ येथे छापुन २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक-१ येथे प्रसिध्द केले.

If undelivered please return to:
Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture
201, Sarda Sankul, Vakil Wadi, M.G. Road, Nashik-1